डॉ. नंदिनी धारगळकर



# प्रश्नज्योतिष

# लेखिकेचे दोन शब्द

मो वैद्यकशास्त्र व ज्योतिषशास्त्र या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी प्रवेश घेतला. अनेक ज्योतिषग्रंथांचा अभ्यास केला. ‘ताजिक नीलकण्ठी’ हा अप्रतिम ग्रंथ अभ्यासला. काहीसे कठीण असे हे शास्त्र पूर्णपणे ज्योतिर्गणितावर बेतले आहे. एका ज्योतिष सेमिनार मध्य प्रश्न शास्त्र भाग पहिला यावर सादरीकरण केले

सर्वांना खूपच आवडले.

इतर ज्योतिषप्रेमोंसाठी ते या वेबसाइट वर टाकत आहे. मद्दामच त्याचे पुस्तकीकरण न करता आहे तसेच यथे सादर करीत आहे

डॉ नंदिनी धारगळकर

एम. डी. पी एच डी

शास्त्री - महाराष्ट्र ज्योतिष परिषद

७०२०५११६४९ व ९५७९०३१२१२

मल - nan240950@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

**Dr. Nandini Dhargalkar**

M.D. Ph. D. (Ayurved)

**Contact:**

C/2 Anupam Complex

Karve Road, Kothrud, 411038

**Phone**: +919921216600

**Mail ID**: nan240950@gmail.com

**SHARADINI DAHANUKAR BEST TEACHER AWARD WINNER 2006**

(MUHS Nashik)

# डॉ. नंदिनी धारगळकर



## Positions held

- Ex-Principal, Rasiklal. M. Dariwal Ayurvedic college, Valsad, Gujarat 396375
- Ex-Dean, RMD Cancer Hospital, Waghaldhara, Valsad, Gujarat
- Ex-H.O.D. Sharira-Kriya Dept. Tilak Ayurved Mahavidyalaya, Pune
- Ex-Member, Adhock Committee, MUHS, Nashik
- Ex-Member, Academy, UG & PG, Para-clinical board, MUHS, Nashik
- Ex-Senior Vice Principal, Tilak Ayurved Mahavidyalaya, Pune
- Examiner & paper setter for UG & PG for last 32 years, Pune University & MUHS, Nashik
- Chief Co-ordinator, Autonomous Courses, ASM, Pune
- Academic faculty and Guide for UG and PG for Pune University & for MUHS
- Ph.D. Guide MUHS, Nashik
- Author of CCIM approved Sharira-Kriya book published by Chaukhambha Sanskrit Series Office, Varanasi
- CCIM syllabus setting 2010-12
- Professor Shrarir-Kriya till 2015 in ASM Pune
- Private consultancy on appointment from 2015 till date for alternative therapy on cardiac diseases

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २८ ऑक्टोबर २०१७


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला अर्धाकोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

ई साहित्यची पुस्तके

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.



# प्रश्न ज्योतिष

डॉ नन्दिनी धारगळकर
एम. डी. पी. एच. डी
शास्त्री (महाराष्ट्र ज्योतिष परिषद)

# प्रास्ताविक

- प्रश्न पडणे हा मानवी मनाचा सहजसुलभ स्वभाव आहे.
- उद्याविषयी कुतूहल वाटणे हेही तितकेच स्वाभाविक आहे.
- ज्याची जन्मपत्रिकाच नाही त्याला खेद वाटणेही नैसर्गिक आहे.
- या पार्श्वभूमिवर ज्यांची जन्मकुंडलीच नाही त्यांना प्रश्न विचारू देवून त्या प्रश्नवेळेची कुंडली मांडून त्यावरून सदरच्या व्यक्तीची अंशात्मक कुंडली कशी काढावी याचे दिग्दर्शन ग्रंथात झाल्यावर बहुधा प्रश्न ज्योतिषाचा जन्म झाला असावा.

# ज्योतिष शास्त्रातील प्रश्न सोडविण्याच्या पद्धति

- प्रश्न ज्योतिष हे वैशिष्टयाने प्रश्नाच्या उत्तरासाठी अभ्यासावे लागते. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर पुढील अनेक पद्धतीने सांगता येते
- वैदिक पद्धतीने - वाराहीसंहिता, पाराशरी, व जन्मलग्नकुंडली च्या मदतीने
- अष्टकवर्गपद्धति
- दशा महादशा पद्धति
- गोचरज्योतिष
- सुदर्शनचक्र

# ज्योतिष शास्त्रातील प्रश्न सोडविण्याच्या पद्धति

- प्रश्नतन्त्र, प्रश्नमार्ग, प्रश्नचिंतामणी, व इतर अनेक ग्रंथ यातील प्रश्न ज्योतिषाच्या अनेक सिद्धान्त व उदाहरणे यावरून
- सर्वतोभद्रपद्धतीने
- अंक पद्धतीने
- नाडी प्रश्न ज्योतिष
- स्वप्न पद्धतीने
- कौल पद्धतीने
- मंत्र जाप पद्धतीने

# ज्योतिष शास्त्रातील प्रश्न सोडविण्याच्या पद्धति

- अष्टमंगल पद्धतीने
- जेमिनी पद्धतीने
- कृष्णमूर्ति पद्धतीने
- ताजिक पद्धतीने
- पाश्चात्य पद्धतीने
- संकेत (ओमेन) पद्धतीने
- पत्ते (टॅरो) पद्धतीने इत्यादि

# आजच्या प्रश्नज्योतिष सेमिनारचे उद्दिष्ट

आजच्या प्रश्न ज्योतिष सेमिनारच्या अंती येथिल प्रत्येक सहभागी:

- साध्या प्रश्नाचे उत्तर नक्की देऊ शकेल
- कुटील प्रश्नास साध्या प्रश्नात परिवर्तित करू शकेल
- प्रश्न कुंडलीचे प्रत्येक पद्धतीचे नियम वेगळे आहेत हे सहज लक्षात ठेवून ज्या पद्धतीने प्रश्न कुंडली सोडवावयाची आहे तेच नियम लावणे अपरिहार्य मानेल
- कालनिर्णय देण्याबाबतीत जागरूक राहील व स्वमर्यादा जाणेल
- गंभीर प्रश्नांची उत्तरे देतांना पूर्वीपेक्षा जास्त काळजी घेईल

# प्रश्न ज्योतिष कोणी सांगावे?

- कोणत्याही सामान्य व्यक्तीस प्रश्न ज्योतिषाचा अधिकार नाही. हा अधिकार केवळ या शास्त्रातील शिक्षित ज्योतिषाचाच. ज्याला स्वतःच्या प्रश्नाचे वाजवी व योग्य उत्तर अपेक्षित असेल त्याने पात्र ज्योतिषाकडेच जाणे योग्य
- त्रिस्कन्द ज्योतिष जाणणाऱ्या ज्योतिषालाच केवळ भविष्य सांगण्याचा अधिकार आहे.
- ज्याला गणित माहित नाही त्याला कोणतेही भविष्य सांगण्याचा अधिकार नाही

# प्रश्न ज्योतिष कोणी सांगावे?

- अत्यंत सत्यवादी
- वाक् सिद्धि प्राप्त
- ज्योतिष शास्त्रात प्रविण ग्रह व त्यांच्या दशावस्थांशी परिचित
- ज्योतिर्गणितात तज्ज्ञ
- कोणाचीही जो फसवणूक करत नाही
- ज्याला वेदांचे ज्ञान आहे
- ज्याला मंत्र व तंत्र ज्ञान आहे

अशा ज्योतिषाला भविष्य विचारावे

# आजच्या सेमिनारच्या मर्यादा

- प्रश्न ज्योतिष हा अतिशय विस्तृत व गहन विषय आहे
- पूर्ण विषय एका दिवशी होणे शक्य नाही
- वेदिक, पाश्चात्य व नवी ग्रंथसंपदा इतकी आहे की एक दिवसात या ग्रंथाची चर्चा अशक्य
- आजच्या सेमिनारला मुख्यत्वे करून ताजिक पद्धति घ्यावी असे सेमिनारच्या ऑर्गनायझर्सनी ठरविले आहे
- त्यामुळे प्रश्न ज्योतिषाला अत्यावश्यक ताजिक मूलतत्वे आज चर्चेला घेतली जातील. पूर्ण ताजिकही आज होणे शक्य नाही.

# प्रश्न ज्योतिष - प्राथमिक नियम

- नापृष्टः कस्यचिद्ब्रूयान्नान्यायेन च पृच्छतः। न विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर स्वतःहून देणे योग्य नाही तसेच योग्य नसलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्याची आवश्यकता नाही
- ज्याला ज्योतिषीची परीक्षा घ्यावयाची आहे त्याला उत्तर देण्याची गरज नाही
- ज्यांना भविष्य जाणून घेण्याची उत्सुकता आहे त्यांना भविष्यवेत्त्याने लग्न भाव, केन्द्र व कोण भावांचा विचार करून भविष्य सांगावे

# प्रश्न ज्योतिष - प्राथमिक नियम

- जो विनम्र नाही व उर्मट भाषेत बोलतो त्याला उत्तर देण्याची आवश्यकता नाही.
- जो सहज भेट झाली म्हणून प्रश्न विचारतो त्यालाही उत्तर देण्याची आवश्यकता नाही.
- सूर्यास्ताला प्रश्न विचारू नये व विचारल्यास उत्तर देण्याची आवश्यकता नाही.
- प्रवासी वा नैसर्गिक विधी करत असलेल्या व्यक्तीने प्रश्न विचारू नये विचारल्यास उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

# कर्ममहत्त्व

- कर्माचे महत्त्व ज्योतिष शास्त्राने अतिशय उत्तमरित्या जाणले आणि जन्मकुंडलीच्या निमित्ताने सामान्य माणसालाही जाणवून दिले
- भाग्य वा पूर्वसंचित भावाचा धनभाव कर्मस्थान आहे व कर्मस्थानाचा धनभाव लाभस्थान आहे.
- स्वत:च्या आजच्या शुभ कर्माने माणूस काही मर्यादेपर्यंत स्वत:चे भाग्य उजळू शकतो
- वैयक्तिक व सामाजिक शांतीमध्ये ज्योतिषशास्त्राचा वाटा फार मोठा आहे.

# कर्ममहत्त्व

- या शास्त्राच्या इतिहासात ग्रीक लोकांच्या हातात जेव्हा ज्योतिष शास्त्राची अर्जितावस्था होती तेव्हा ज्योतिषातील होरा वा भविष्य या स्कंदापेक्षा तात्त्विक भागाचा विकास अधिक झाला.
- यवनांनी मांडलेल्या अनेक तत्त्वांना हिंदु ज्योतिष शास्त्राने कधी सामावून घेतले ते कळलेही नाही
- विकसित प्रश्न ज्योतिष हिंदूंकडे नव्हते असे नाही परंतु ते काहीसे क्लिष्ट होते. त्यामानाने गणित मांडून अधिक सोप्या रीतीची ताजिक पद्धत म्हणूनच आपल्यात आत्मसात झाली. उदा. वर्षफल
- तात्कालिक कर्म मार्गदर्शनासाठी प्रश्न ज्योतिष हा उत्तम मार्ग होय

# वेदांग प्रश्न ज्योतिष

- प्रश्न ज्योतिष असा शुद्ध विभाग होरा ज्योतिषात वेदकालात विकसित नव्हता
- बृहज्जातकात त्याची झलक पहावयास मिळते पण तीही पुरेशी नव्हे व आजच्या काळासाठी पर्याप्तही नव्हे
- भारताच्या उत्तरेस अविकसित राहिलेले प्रश्न ज्योतिष दक्षिणेकडे मात्र उत्तमरित्या जोपासले गेले. त्यातील सर्वमान्य प्रश्नमार्गाला व अशाच ग्रंथांना जपले व अभ्यासले गेले.
- अशा अनेक ग्रंथातील संकलन येथे दिले जाणार आहे

# वेदांग प्रश्न ज्योतिषाची तत्त्वे

- जन्मलग्नतया प्रश्नलग्नं संकल्प्य पंडितः। जातके यद्यदुद्दिष्टं तत्तद् प्रश्नपि चिन्तयेत्।। याचा अर्थ  जसे जन्मलग्न असते तसेच प्रश्नलग्न असते आणि म्हणूनच सर्व घटना ज्या जन्मलग्नापासून पाहिल्या जातात त्याच प्रश्नलग्नापासून पहाव्यात; मात्र त्या भावसंदर्भित व तात्कालिक स्वरूपाच्या व योगाच्या असल्याचे तारतम्य ज्योतिषी बरोबर ठेवतो
- प्रश्न विचारणे व उत्तर देणे यासाठी ग्रंथानी निषिद्ध सांगितलेल्या वेळा अशुभ मानाव्यात व अमृतघटिकांच्या वेळी शक्यतो आपले प्रश्न घेवून योग्य त्या ज्योतिषाकडे जावे.

# वेदांग प्रश्न ज्योतिषाची तत्वे

- मूळ वेदांग ज्योतिष शास्त्रातील ग्रह नक्षत्र राश्यादि गुणधर्म व तत्वे प्रश्न ज्योतिषातील कुंडलीवाचनाच्या व्यवहाराच्या वेळी उपयोगात आणावी हे सामान्यत: अपेक्षित आहे. मात्र तात्कालिक होरा कथन करावयाचा असल्याने बुद्धिमान ज्योतिषाने तर्कबुद्धीचा वापर करणे आवश्यक आहे.
- ज्योतिषाने सर्व नीति नियम पाळून कोणतीही अभिलाषा मनी न धरता पूर्ण लक्ष सर्व ज्योतिष सिद्धान्तावर व संहितेवर केंद्रित करूनच प्रश्नाचे उत्तर द्यावे.

# प्रश्न विचारण्यासाठी निषिद्ध काल

- बालकाच्या प्रथमाशनासाठी अशुभ नक्षत्रे - भरणी कृत्तिका आर्द्रा आश्लेषा मघा पूर्वा विशाखा ज्येष्ठा मूळ पूर्वाषाढा
- गण्डान्त - आश्विनी प्रथम चरण, मघा, मूळ, व आश्लेषा ज्येष्ठा व रेवतीचा चतुर्थ चरण
- उष्ण नक्षत्रे - आश्विनी रोहिणी पुनर्वसु मघा व हस्त नक्षत्राच्या साडे सात ते पंधरा घटिका; भरणी मृग पुष्य पूभा व चित्रा यांच्या ५५ ते ६० घटिका; कृत्तिका आर्द्रा आश्लेषा उत्तरा स्वाती यांच्या २१ ते ३० घटिका; विशाखा मूळ श्रवण पूभा प्रथम चरण १ ते ८ घटिका;

# प्रश्न विचारण्यासाठी निषिद्ध काल

अनुराधा पूषा धनिष्ठा उभा ५२ ते ६० घटिका; ज्येष्ठा उषा शततारका रेवती २० ते ३० घटिका

- विष नक्षत्रे - अश्विनी भरणी इ २७ नक्षत्रांच्या पुढील आकडयांपासून पुढे चार इतक्या घटिका विष मानाव्यात. ५०, २४, ३०, ४, १४, ११, ३०, २०, ३२, ३०, २०, १८, २२, २०, १४, १४, १०, १४, २०, २४, २०, १०, १०, १८, १६, २४, ३०
- रिक्ता तिथि - चतुर्थी नवमी चतुर्दशी

# प्रश्न विचारण्यासाठी निषिद्ध काल

- करण - विष्टी व स्थिर करणे म्हणजे शकुन चतुष्पाद नय किंस्तुघ्न
  - तिथी व नक्षत्र संधीची पहिली व शेवटची घटी (२४ मिनिटे)
  - राशीची पहिली व शेवटची पाच विघटी (२ मिनिटे)
  - प्रत्येक नवांशाची पहिली व शेवटची पाच विघटिका (२४ सेकंद)
- गुलिकोदय काल
- यासाठी अमृतघटिकांवरच प्रश्न विचारणे व ज्योतिष्याने प्रश्नकर्त्यास भविष्य मार्गदर्शन करणे योग्य

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

- जन्मलग्नकुडलीत जी राशी पापग्रहाक्रान्त असेल ती कालपुरुषाच्या ज्या अंगाची असते ते अंग जातकाचे दुर्बल असते. बृ जा १.४
- मेषादि त्रिकोण राशी पूर्व दक्षिण पश्चिम व उत्तर दिशेचे अधिपति असतात.
- विषम राशींचा पहिला होरा सूर्याचा तर सम राशींचा चंद्राचा असतो प्रति होरा हा प्रमाणाने १५ अंश इतका असतो
- द्रेष्काणाबाबत पहिला १ ते १० अंशांचा होरा त्याच राशीचा दुसरा १० ते २० अंशांचा पंचमातील व पुढचा नवमातील राशीचा

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

- द्रेष्काणाबाबतची मतमतांतरे वराहास व आचार्य सत्याचार्य यांना मान्य नाहीत
- ३, ६, १०, ११ ही नित्य उपचय स्थाने आहेत. बृ जा १५. उपचय या शब्दाचा अर्थ वृद्धि वा वर्धमान. मतांतरांशी वराह सहमत नाहीत.
- केंद्रस्थित सर्व राशी बलवान, पणफरस्थित मध्यबल व आपोक्लिमस्थित हीनबल असतात. बृ जा १९
- राशीमान पुढील सूत्रावरून ठरविले जाते. मेष २००; वृषभ २४०; मिथुन २८०; कर्क ३२०; सिंह ३६० व कन्या ४०० बृ जा ११

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

**राशीमानाचे सूत्र:**

**५ ते १० आकडयास ४० ते गुणावे मेष ते कन्या; व व्युत्क्रमाने बाकी राशींचे मान मिळते**

**५ X ४० = २०० मेष या पद्धतीने कन्यापर्यंत व मग उलटी माने**

- **याचा उपयोग जन्मलग्नकुंडलीत उंची अंगांची लघुता दीर्घता यासाठी होतो**
- **नष्ट वस्तु ज्ञानात याचा उपयोग कसा होतो त्याचे वर्णन पुढे दिले आहे**

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

- राशी वर्ण व प्लव

१ लाल; २ सफेद; ३ हिरवा; ४ सफेत + रक्तवर्णीय; ५ श्वेतमिश्रित पांडुर; ६ मिश्रवर्ण; ७ काळा; ८ सोनेरी; ९ पिवळा; १० बहुवर्ण; ११ भुरा; १२ स्वच्छ

- प्लव

राशींचा प्लव ग्रहांच्या दिशेने असतो. मेष दक्षिण दिशेने; याचा उपयोग चोरी झालेली वस्तु दक्षिण दिशेने शोधावी.

चोर कसा असावा यासाठी; अरिष्टशांति; प्रसवगृहाची दिशा इ

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

- जातकाच्या शुभ ग्रह दशादि भोगसमयी ग्रह तत्वा नुसार तसेच जातकाची बली स्थिति व प्रश्नलग्नेष्ट ग्रहबला नुसार नष्ट द्रव्याच्या बाबतीत चोराची जाति धर्म स्त्री पुरुष इ समजण्यासाठी उपयोग
- शनि स्नायु; सूर्य अस्थि; चंद्र रक्त; बुध त्वचा; शुक्र वीर्य; गुरु वसा व मंगळ मज्जा - शरीरावयवावर परिणाम प्रबल ग्रहाचा किती आणि काय होतो
- ग्रहदृष्टि - ३,१० एकपाद; ५,९ द्विपाद; ४,८ त्रिपाद; ७ पूर्ण अपवाद शनि ३,१०; गुरु ५,९; मंगळ ४,८

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

- राहु व केतु ज्या भावात असतात त्या भावाचे गुण व ज्या ग्रहांबरोबर असतात त्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडून त्यांना अधिक ताकद देतात जा. चं. १२
- द्वितीय व द्वादश भावातील ग्रह यांचे वैशिष्टय असे आहे की ते ज्या ग्रहांबरोबर असतील त्यांचा प्रभाव यांच्यावर यांच्या स्वत:च्या गुणांपेक्षा अधिक पडतो.          जा.चं टीका
- गुरु व शुक्रापेक्षा बुध कमी पापग्रह व बुधापेक्षा चंद्र कमी पापग्रह आहे. रवि व चंद्र अष्टमात देखिल अशुभ फळे देत नाही. जा.चं.१४

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

- लग्नापासून ८वे स्थान व ८व्याचे ८वे स्थान यांना आयुभाव म्हणतात. या दोन्ही आयुभावांपासून १२व्या भावाला मृत्यु भाव म्हणतात.
- मृत्यु देण्यात सप्तम भावापेक्षा द्वितीय भावाचे बल अधिक व द्वितीयेशापेक्षा द्वितीय भावातील ग्रह मारक असतात. द्वितीयेश ज्या ग्रहाबराबर असतो तो त्याहीपेक्षा मारक असतो जा चं २३
- गुरू, बुध व शुक्र हे द्विपाद ग्रह; शनि, रवि व मंगळ चतुष्पाद ग्रह; चंद्र बुध बहुपाद ग्रह आहेत. यांपैकी चंद्र बुध तेज ग्रह आहेत. शनि रवि गुढग्यावर रांगतात; बाकी सर्व ग्रह पायावर चालतात.प्रअल३४

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

- चंद्र, मंगळ व शनि रात्री बलि असतात.
- बुध दिवसा व रात्री दोन्ही वेळा बलि असतो.
- सूर्य गुरु शुक्र दिवसा बलि असतात
- पापग्रह कृष्णपक्षात व शुभग्रह शुक्लपक्षात बलि असतात
- षडबल - दृक्‌बल, दिशाबल, कालबल, स्थानबल, चेष्टाबल व नैसर्गिक बल

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

- सूर्याला ५ रश्मी, चंद्राला २१ रश्मी. मंगळ ७ रश्मी; बुध ९ रश्मी; गुरू १० रश्मी; शुक्र १६ रश्मी; शनि ४ रश्मी प्रअल ६२
- मेष ८ वृषभ ११ मिथुन ६ कर्क ११ सिंह ३ कन्या ६ तुला १४ वृश्चिक १४ धनु १० मकर १०० कुंभ ४ मीन ३४ प्रअल ६८
- ग्रहाचा प्रभाव किती योजने पडतो - सूर्य शनि बुध ८ योजने; शुक्र १६; गुरू १०; मंगळ ७ चंद्र २१ योजन प्रअल ६९
- ग्रहांची वये - मंगळ १६ शुक्र ७ बुध २० गुरू ३० चंद्र ७० सूर्य ५० शनि व राहु १००

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

- शरीराच्या उजव्या बाजूला सूर्य बुध मंगळ गुरू मुळे व डाव्या बाजूला राहु चंद्र शुक्र शनि मुळे खुणा उमटतात प्रअल ७३
- शुक्रामुळे चेहरा; मंगळामुळे पार्श्व; गुरूमुळे खांदे; बुधामुळे काखा; चंद्रामुळे डोके; सूर्यामुळे पार्श्वभाग; शनीमुळे मांडया; राहूमुळे पाय या अवयवांवर विशिष्ट खुणा असतात प्रअल ७४

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

- जातक वा प्रश्नकर्ता याच्या कालनिर्णयाच्या प्रश्नाबाबत प्रश्नलग्नातील ज्या ग्रहाचा नवमांश सूर्यापासून जितका लांब असेल तितके अयन म्हणजे मास; चंद्रापासून घटिका वा ४८ मिनिटे; मंगळापासून दिवस; बुधापासून ऋतु वा दोन मास; गुरूपासून महिने; शुक्रापासून पक्ष; शनिवरून वरून वर्ष मोजावीत
- ग्रहमैत्री यवनाचार्य व सत्याचार्यांच्या मतातील फरक पुढे दिला आहे. नैसर्गिक + तात्कालिक = अधिमित्र / शत्रु; नैसर्गिक शत्रु / मित्र + सम = शत्रु/मित्र; या प्रकाराने पंचधा प्रकार असतात

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

**नैसर्गिक ग्रहमैत्री**

| ग्रह | सू. | चं. | मं. | बु. | बृ. | शु. | श. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मित्र | चं. मं. बृ. | सू. बु. | सू. चं. बृ. | सू. शु. | सू. चं. मं. | बु. श. | बु. शु. |
| सम | बु. | मं.बृ. शु. श. | शु. श. | मं. बृ. श. | श. | मं. बृ. | बृ. |
| शत्रु | श. शु. | × | बु. | चं. | बु. शु. | सू. चं. | सू. चं. मं. |

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

**यवन ग्रहमैत्री**

| ग्रह | सू. | चं. | मं. | बु. | बृ. | शु. | श. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मित्र | बृ. | बृ. बु. | बु. शु. | चं. मं. बृ. शु. श. | सू. चं. बु. शु. श. | मं. बु. बृ. श. | बु. बृ. शु. |
| शत्रु | चं. मं. बु. शु. श. | सू. मं. शु. श. | सू. चं. बृ. शु. | सू. | मं. | सू. चं. | सू. चं. मं. |

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

| ग्रह | राशी | मूलत्रिकोण | स्वगृह |
| --- | --- | --- | --- |
| रवि | सिंह | ० ते २० | २० ते ३० |
| चंद्र | वृषभ | ० ते ०३ | बाकी २७ अंश |
| मंगळ | मेष | १२ अंश | बाकी १८ अंश |
| बुध | कन्या | २० अंश | बाकी १० अंश |
| गुरू | धनु | १० अंश | बाकी २० अंश |
| शुक्र | तुला | १५अंश | बाकी १५ अंश |
| शनि | कुंभ | २० अंश | बाकी १० अंश |

सारावलि

# वेदिक पद्धतीत प्रश्न कुंडलीचे सामान्य नियम

| ग्रह | अस्तंगत अंश |
|---|---|
| रवि | |
| चंद्र | |
| मंगळ | १७ अंश |
| बुध | १२ अंश वक्री असतांना   १४अंश मार्गी |
| गुरू | ११ अंश |
| शुक्र | ८ अंश |
| शनि | १५ अंश |

# षट्पंचशिखा प्रश्नज्योतिष नियम

- पृथुयश वराहमिहिराचा पुत्र. त्यांनी हा ग्रंथ रचला
- च्युति, वृद्धि, प्रवास निवृत्ति या चार समस्या अनुक्रमे लग्न, चतुर्थ, दशम व सप्तम भावांवरून पाहतात.
- च्युति याचा अर्थ ढळणे. कोणत्याही प्रकारचा बदल मग तो स्थानात असो नोकरीत असो वा मानहानीचा असो येथे दर्शविला जातो
- चर लग्न लग्नेश वा शुभग्रहदृष्ट वा युक्त असेल तर शुभ

# षट्पंचशिखा प्रश्नज्योतिष नियम

- स्थिर लग्न असेल तर शुभग्रहयुक्त वा दृष्ट असून बदल नाही
- द्विस्वभावी लग्न असेल तर शुभग्रहयुक्त वा दृष्ट असेल तर बदल
- वृद्धिचा संबंध घर, यश, भरभराट, आनंद, मित्र, इ घ्यावा
- प्रवासाचा संबंध घरापासून, देशापासून दूर जाणे इ घ्यावा
- निवृत्तीचा संबंध घरी परत येणे प्रवासावरून वा परदेशाहून इ घ्यावा
- ज्या भावाचा प्रश्न असेल त्याचा भावेश त्या भावासाठी शुभच माना
- त्या भावात शुभ ग्रह असतील वा दृष्टि असेल तरी शुभ

# षट्पंचशिका प्रश्नज्योतिष नियम

- या ग्रंथात हरवलेली वस्तु समजण्यासाठी वेगळी पद्धत दिली आहे. समजा मेष राशी असेल तर पहिला नवमांश धातु, दुसरा जीव व तिसरा मूळ; वृषभ असेल तर पहिला जीव दुसरा मूळ व तिसरा धातु अशा रीतीने पुढील टेबल निर्माण होते

| नवमांश | विषम राशी | सम राशी |
|---|---|---|
| १,४,७ | धातु | जीव |
| २,५,८ | मूळ | मूळ |
| ३,६,९ | जीव | धातु |

# वेदिक प्रश्न कुंडली पहातांना प्रमुख बाबी

- लग्न
- चन्द्र व केन्द्र
- प्रश्नकर्ता स्वतः प्रश्न विचारत असेल तर लग्न नपेक्षा तो ज्याच्या विषयी प्रश्न विचारतो तो भावेश
- नवमांश कुंडली
- शुभग्रहदृष्ट व युक्त भाव व ग्रह
- पापग्रहदृष्ट व युक्त भाव व ग्रह

# कोणती पद्धत वापरावी याचे नियोजन

- सर्वप्रथम ज्योतिषाने हे ठरविले पाहिजे की तो कोणती पद्धत वापरणार आहे.
- प्रत्येक पद्धतीचे स्वतःचे नियम आहेत. कोणतेही नियम कोठेही वापरल्यास अचूकता राहत नाही
- वेदिक पद्धतीस ताजिकचे नियम लावून कसे चालेल? ताजिक पद्धतीस कृष्णमूर्तिपद्धत वापरून प्रश्न कसा सुटेल?
- अष्टांग मंगल देव पद्धत प्रात्यक्षिकाशिवाय कशी येणार?

# वेदिक जन्म व प्रश्न कुंडली तुलना

- दोन्ही कुंडल्या बनविण्यासाठी जन्मवेळ / प्रश्नवेळ त्याचप्रमाणे तारीख व स्थळ इतक्या बाबींची आवश्यकता आहे.
- जन्मवेळ ३ जातकाची व प्रश्नवेळ ३ ज्योतिषाची घ्यावी लागते
- ग्रहांचे शुभाशुभत्व हे जन्मलग्नकुंडलीचे नैसर्गिक देखिल वाचले जाते. मात्र प्रश्नकुंडलीत केवळ शुभ भावांचे भावेश मानावे लागतात.
- दशा महादशांचे वाचन मात्र दोन्ही कुंडलीत सारखेच करतात

# अरुध लग्न काढण्यासाठी आवश्यक बाबी

- अचूक वेळ
- देश - प्रश्नकर्त्याच्या बसण्याची नक्की दिशा
- ज्योतिषाची चालू नाडी
- ज्योतिषाची अवस्था
- प्रश्नकर्ता कशास स्पर्श करतो
- अरुध राशी
- दिशा

# अरुध लग्न काढण्यासाठी आवश्यक बाबी

- प्रश्नाक्षर - प्रश्नकर्ता कोणत्या अक्षरवर्गाने सुरुवात करतो
- प्रश्नकर्त्याची स्थिति
- प्रश्नकर्त्याच्या चेष्टा वा हालचाली
- प्रश्नकर्त्याचा भाव - मनाची स्थिति
- प्रश्नकर्ता कोठे पाहून विचारतो - विलोकनम्
- प्रश्नकर्त्याचे कपडे - वसनम्
- निमित्त - त्या क्षणीचे शुभाशुभ संकेत

# अरुध लग्न

- अष्टमंगल देव प्रश्न ज्योतिषात अरुध लग्नाला विशेष महत्त्व आहे.
- काही ग्रंथात प्रश्नलग्नकुंडलीत अरुध व उदित दोन्ही लग्ने काढतात.
- जन्मलग्नकुंडलीत आधान लग्न काढतात. मात्र त्याचे गणित व पद्धति पूर्णपणे वेगळी आहे.
- पुढे भविष्यवाचनासाठी मात्र उदित लग्नाचादेखिल विचार केल्याचे जाणवते
- इतर पद्धतीत मात्र अरुध लग्नाचा वैशिष्टयपूर्ण उल्लेख दिसत नाही

# अरुध लग्न

- अरुध लग्न काढण्यासाठी प्रश्नकर्त्याची दिशा महत्वाची ठरते. बारा राशी आठ दिशांना दिल्या आहेत व प्रश्नकर्ता कोठे बसून प्रश्न विचारतो यास महत्व दिल आहे. मेष वृषभ - पूर्व; मिथुन - अग्नेय; कर्क सिंह - दक्षिण; कन्या - नैऋत्य; तुला वृश्चिक - पश्चिम; धनु - वायव्य; मकर कुंभ - उत्तर; मीन - ईशान्य
- प्रश्नकर्त्यावर आरूढ होवून येणारी राशी अशी यामागची कल्पना आहे.
- प्रश्नकर्ता स्थिर नसेल, अस्वस्थ असेल व येरझारा घालत असेल तर त्याला स्पर्श करावयास सांगून दिशा शोधावी

# अष्टमंगल देव प्रश्न कुंडली

- अमाप अनुभव, प्रचंड तर्कबुद्धि, ज्योतिषाचे अगाध ज्ञान व प्रत्यक्ष कुंडली मांडणे व सोडविणे याचा हातखंडा असेल तरच हा मार्ग
- याचे जरी प्रश्नमार्गात वर्णन केले असले तरी हा विषय एकादी कुंडली प्रत्यक्ष सोडवितांना पाहूनच लक्षात येतो
- येथे केवळच संकेत काम करतात असे नव्हे तर ज्योतिषाचे मूलभूत ज्ञानही अत्यावश्यक ठरते. ते नसेल तर संकेत व कुंडलीतील ग्रहराशीचा अर्थ लावणे अशक्य होवून बसते

# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- खास मंदिरांचे प्रश्न सोडविण्यासाठी ही पद्धत वापरली जाते. यात दोन गोष्टी महत्वाच्या असतात पहिली म्हणजे
- आठ मंगलमय वस्तूंचा अंतर्भाव - तुपाचा दिवा, आरसा, सोने, दूध, दही, फळे, पुस्तक, व पांढरे वस्त्र.
- दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे अंकशास्त्राचा वापर.
- येथे केवळ मंदिराचे प्रश्न सोडवितात.
- ज्योतिषाला आपला अनुभव, बुद्धि, जपजाप्याचे पुण्य व तर्कबुद्धि असे गुण पणाला लावून या पद्धतीने उत्तर द्यावे लागते

# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- याची तयारी जागा स्वच्छ करण्यापासून असते. त्यावर तांदूळ घालून प्रश्नकर्त्याला पांढरी फुले, तुपाचा दिवा, पानसुपारी इ मांडावे लागते. उपकरणांची पूजा केली जाते. श्रीकृष्णदेव व इष्ट देवतांची आराधना केली जाते व योग्य भविष्यासाठी साकडे घातले जाते
- मंदिरातील एकाद्या ज्योतिष न जाणणाऱ्या महत्वाच्या व्यक्तीस काठीने दक्षिण भारतीय ज्योतिष पद्धतीचे राशीचक्र काढावयास सांगितले जाते. या विशिष्ट वेळी प्रथम पश्चिम, मग दक्षिण, पूर्व व शेवटी उत्तरेकडील कुंडलीचा भाग रेखाटला गेला.
- प्रश्नकुंडलीत मेष वृषभ पूर्वेला; कर्क सिंह दक्षिणेला; तुला वृश्चिक पश्चिमेला व मकर कुंभ उत्तरेला असतात.

# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- पंडितांनी राशीचक्र काढतांना पहिली पश्चिम दिशा घेतली त्यावरून व त्यानंतर दक्षिण घेतली त्यावरून अपशकून व रोगराईचा उद्भव व वाढ होण्याचे भाकित केले. त्यानंतर त्यांनी रेषांचे निरीक्षण केले. पण त्यांना वैशिष्टयपूर्ण असे काही मिळाले नाही.
- पद्धतशीर रीती पाळून एका आंघोळ केलेल्या स्वच्छ वस्त्रातील मुलाला बोलावले गेले व त्याने पूर्वेकडे तोंड करून सर्व नियम पाळून कन्या राशीवर सोने ठेवले. अरुध लग्न कन्या झाले
- प्रश्नकर्ता यावेळी भगवानाचा आठव करीत होता.
- अरुध वा सुवर्ण लग्नानंतर उदित लग्न सिंह काढले गेले

# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- मांदीसह सर्व ग्रहांची स्थापना कुंडलीत केली गेली. उदित लग्न ४।१२।१३ असल्याने अरुध लग्न ६।१२।१३ ठरविले गेले
- अरुध लग्नाचा नवांश कर्क ३।३।२० ठरविले गेले. तेथील सोने वृश्चिक राशीच्या चौकोनात बरोबर मध्ये व पालथे, अक्षता व फुलांवर पडले होते व दक्षिण दिशेस तिरके होते
- ज्योतिषांनी यासही अपशकून मानला. यानंतर प्रमुख ज्योतिषाने कवडीचे अंदाजे तीन ढीग करून त्यातून ८चे समुदाय काढून बाकी मोजल्या. जिथे ० राहिले तिथे ८ राहू दिले. या प्रश्नात ८-३-१ अशा कवडया मिळाल्या


# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- यातील अंकशास्त्राप्रमाणे १ = सूर्य; २ = मंगळ; ३ = गुरू; ४ = बुध; ५ = शुक्र; ६ = शनि; ७ = चंद्र; ८ = राहु; विषमांक शुभ
- तीन ढीगांची बाकी आली ८ ३ १ अर्थात् राहु गुरू सूर्य. नियमाप्रमाणे सुरूवात अशुभ पण अखेर शुभ असायला हवी होती
- परंतु उतरता क्रम असल्याने ज्योतिषी सुरूवात बरी पण मध्य वाईट व अखेर अजूनच वाईट मानत होते.
- तुपाचा दिवा प्रश्न विचारण्या आधी दोनदा हलविला गेला त्यावरून ज्योतिषाने विचारले की मूर्ति अधिष्ठापनेआधी २दा हलविल्या गेल्या होत्या का व ते संबंधितांकडून मान्य केले गेले

# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- पानसुपारीतील पान हे बारा भाव दर्शवते.
- प्रथम भाव मंदिर, मूर्ति व प्रतिष्ठापना दर्शवितो
- द्वितीय भाव मंदिराचे विश्वस्त, खजिना, वैभव भरभराट
- तृतीय भाव नैवेद्य व नोकर दर्शवितो
- चतुर्थ भाव मंदिराची वाहने व इतर मंदिरा निगडित बांधकामे
- पंचम भाव मूर्ति व तिच्यातील परमेश्वरत्व
- षष्ठ भाव मंदिराचे प्रदूषण, शत्रु व चोर
- सप्तम भाव जनता व देवाचे दागिने

# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष



# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- अष्टम भाव दैवी शक्ती, दान, सेवक दर्शवितो
- नवम भाव विश्वस्तांचे स्वभाव मंदिराचा दर्जा व पावित्र्य दर्शवितो
- दशम भाव दैनंदिन पूजाअर्चा, भजने, हार बनविणारे लोक, विशेष देवादिकांचे प्रसंग, प्रवचने इ.
- एकादश भाव मंदिराची आय, मालमत्ता, पवित्रता, इ
- द्वादश भाव पुजारी व त्यांचे स्वभाव, मंदिराचा खर्च, वाया जाणाऱ्या बाबी इ दर्शवितो
- या प्रश्नात पहिल्या तीन भावात पाने असल्याने केवळ तेवढेच प्रश्न सोडविणे शक्य होते

# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- प्रथम पान प्रथम भाव दर्शवित असून त्यावर चरे असल्याने अजून सर्व नीट नसल्याचे भाकित करण्यात आले
- दुसरे पान जरा छोटे असल्याने अजून आर्थिक चणचण असल्याचे भविष्य वर्तविण्यात आले
- तिसरे पान ठीक असल्याने मंदिराचे सेवक योग्य ती मंदिराची काळजी घेतात असे सिद्ध झाले
- यानंतर तांबुललग्न ठरविण्यात आले. हे पुढील सूत्रानुसार ठरविण्यात येते: ((पानांची संख्या गुणिले १०) +१)/७

# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- पाने ३ होती व वेदिक ज्योतिषाच्या ग्रहक्रमांकाप्रमाणे (रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरू, शुक्र, शनि, राहु, केतु) तिसरा ग्रह मंगळ. तुला या राशीत मंगळ असल्याने तुला हे तांबुल लग्न झाले
- मंगळ तुलेत असल्याने ज्योतिषी कालिमातेचे मंदिर असल्याविषयी सांगत होते
- ग्रहस्थितीवरून पुढील भविष्य सांगण्यात आले.
- राहु प्रथम क्रमांकाचा मालक असल्याने व तो दशमात शुक्राबरोबर असल्याने सध्याचे मंदिर अजून पूर्वेला हवे नागवस्तीच्या ठिकाणी होते असे ज्योतिषी म्हणाले व ते विश्वस्तांनी मान्य केले

# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- मंगळ नुकताच तुलेत आल्याने एका ज्योतिष्याने सांगितले की मंदिरास पूर्वी आग लागण्याचा अपघात झाला होता. ते खरे होते
- अजून एका ज्योतिषाने सांगितले की राहु दशमात शुक्राबरोबर असल्याने जवळच कोणीतरी विष घेवून आत्महत्या केली.
- एका ज्योतिषाने सांगितले की शनि अरुध लग्नी असल्याने माता दुर्गा मंदिर सोडून का गेली हा मुख्य प्रश्न आहे. सर्वांनी कबूल केले की तोच प्रश्न होता.
- ज्योतिषाने समर्थन केले की माता वाईट वागणे सहन न झाल्याने गेली.

# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- अरुध लग्न हे कन्या असल्याने जमीनीची मालकी विशिष्ट रीतीने स्त्रियांकडे असल्याचे ज्योतिषाने सांगितले. हेही मान्य झाले.
- कन्या लग्नाचा मंगळ महाबाधक व गुरू बाधक हे दोन ग्रह द्वितीय स्थानी असल्याने व कन्या नवमांशात केतु असल्याने ज्योतिषाने कुटुंबातील कोणाचा तरी मृत्यू झाल्याचे भाकित वर्तविले
- झाडावरून पडून त्यांच्या कुटुंबात मृत्यु झाला हेही मान्य झाले. त्या विषबाधा झालेल्या मुलाबरोबर सदर मृत व्यक्ती मंदिरात आश्रयास आली व मंदिर प्रदूषित केले असेही त्यांनी कथन केले.

# अष्टमंगल देव प्रश्नज्योतिष

- बाधक गुरू बाधक मंगळाबरोबर असून शुक्रावर नजर देत असल्याने पडून मृत पावलेला पिशाच्च योनीतील ब्राह्मण मंदिरात आल्याने दुर्गेतील भद्रकालीचे स्वरूप जागृत झाले आहे. विश्वस्तांनी भद्रकालीला दूर करून दुर्गेस तेथे राहू द्यावे
- चतुर्थेश गुरू असल्याने व चतुर्थात केतु असल्याने मंदिर पुनश्च बांधून काढण्याची आवश्यकता आहे. दशम व द्वादश भाव अशुभ असल्याने पुजारी अजून पावित्र्यपूर्ण पूजाअर्चा करतील असे पाहिले पाहिजे. अष्टम भावाची स्थिति पाहता नैवेद्य व दानधर्म तसेच देवतेस प्रसन्न करण्याचे सर्व मार्ग अवलंबावेत

# प्रश्न स्वरूप

- मनाच्या अतिउत्कट स्थितीत आलेला प्रश्न योग्य ज्योतिषाला विचारला तरच योग्य व अचूक उषर मिळते
- प्रश्न कोठूनही विचारला तरी ज्योतिषी जेथे आहे तेथीलच कुंडली तो मांडतो
- सर्व साधारण प्रश्न ज्याचे उत्तर हो वा नाही असेल असे असतात.
- एकादा प्रश्न तसा नसेल तर ज्योतिषाने त्याचे स्वरूप नीट जाणून घेणे आवश्यक ठरते. तो प्रश्न पुनर्स्थापित करून प्रश्नकर्ता हेच विचारू इच्छितो याची निश्चितीही आवश्यक आहे.

# प्रश्न स्वरूप

**प्रश्न कशाविषयी असावा याचे ठोकताळे:**

- **रवि किंवा मंगळ बलवान असून केंद्री असतील तर धातु; बुध शनि तर मूल व चंद्र गुरु शुक्र असतील तर जीव हे प्रश्नस्वरूप समजावे**
- **१,५,८ लग्न मंगळ रवि ने युत वा दृष्ट असेल तर धातु; ३,६,११ लग्न बुध शनि युक्त वा दृष्ट असेल तर मूल व २,४,७,९,१०,१२ लग्न जर चंद्र गुरु शुक्राने युक्त वा दृष्ट असतील तर प्रश्नस्वरूप हे जीव समजावे**

# सामान्य प्रश्न

१. माझे आरोग्य सुख आयुर्दाय इ कसे राहील?
२. मी पास होईन का? मला शिक्षण किती मिळेल?
३. माझे पदवीनंतरचे शिक्षण होईल का?
४. मी नोकरी करावी की स्वतःचा व्यवसाय?
५. सध्याची माझी नोकरी ठीक आहे की बदलू?
६. बदलल्यावर माझी नोकरी ठीक असेल का?
७. माझी आर्थिक स्थिती कधी बदलेल?

# सामान्य प्रश्न

८. मला घर मिळेल का?

९. मी भाडयाने घर दिले आहे. त्याचे काय होईल?

१०. माझा विवाह होईल का?

११. माझी पत्नी कशी असेल? कोण गावाची असेल?

१२. माझे व तिचे पटेल का?

१३. मला मूल हवे आहे, होईल? कधी?

१४. मला परदेशी जायचा योग आहे का?

# सामान्य प्रश्न

१५. अमुक रुग्ण हॉस्पिटलमध्ये आहे. त्याचे पुढे काय होईल?

१६. अमुक व्यक्ती परदेशी गेली आहे. पुढे काय?

१७. परमेश्वरासाठी तीर्थयात्रेला जाण्याची इच्छा आहे? कधी जाऊ?

१८. यात्रेत काही त्रास तर होणार नाही ना?

१९. माझी अंगठी हरवली आहे. मिळेल?

२०. माझा कुत्रा दिसत नाही. जिवंत असेल ना?

२१. मला गाडी घ्यायची आहे. कधी घेऊ?

# सामान्य प्रश्न

२२. माझे कर्ज फिटेल?

२३. मी कोर्टात केस केली आहे. जिंकेन?

२४. आज भारत पाकिस्तान मॅच आहे. भारत जिंकेल?

२५. २०१९च्या इलेक्शनमध्ये मोदी सरकार जिंकेल?

प्रश्न कितीही जमवता येतील. त्या प्रश्नांना कोणत्या रूपात आणून कुंडली सोडवावयची हे ज्योतिषाचे कसब आहे. एका ग्रंथाचा नीट अभ्यास केला तरी हे सहज शक्य आहे.

# प्रश्न कुंडलीचे विश्लेषण करतांना

- ज्या पद्धतीने प्रश्न सोडविण्याचे नियोजन केले आहे त्याच पद्धतीने कुंडली मांडावी व विश्लेषण करावे
- कुंडली मांडण्याच्या पद्धतीत देखिल वेदिक, अष्टमंगल देव प्रश्न पद्धती, कृष्णमूर्ति पद्धति, ताजिक पद्धति इ पद्धतीत एकमेकांपेक्षा काही ना काही फरक आहे.
- कोणत्याही पद्धतीने विश्लेषण करतांना द्विस्वभावी राशीस पहिल्या अर्ध भागास वा १५ अंशास स्थिर राशीप्रमाणे मानावे व दुसऱ्या १५ अंशास चर राशीप्रमाणे मानावे असे समजतात

# प्रश्नज्योतिष - भाव शुभाशुभत्व

**भावांचे शुभाशुभत्व**

- जो भाव भावेशाने वा शुभग्रहाने दृष्ट वा युक्त असेल तो शुभ वृद्धि
- जो भाव पापग्रहाते दुष्ट वा युक्त असेल तो अशुभ व हानितकारक
- जसे की प्रश्नलग्नात शुभग्रह असतील वा लग्न वर्गोत्तम असेल वा शीर्षोदय राशी असेल तर कार्यसिद्धि होणार; पापवर्ग वा पापग्रह असतील तर कार्यनाश होण्याची शक्यता; व मिश्र स्थिति असेल तर कार्यसिद्धि खूप प्रयत्नाने होवू शकण्याची शक्यता
- लग्नेश कार्येश एकमेकांना, स्व परस्पर भावांना दृष्ट व चंद्राशी कांबूल योगात असतील तर कार्यसिद्धि निश्चित. चंद्रविना कार्य पूर्ण नाही

# प्रश्नज्योतिष - कार्यसिद्धि किती

- लग्नेश लग्नाला पहात नसेल व शुभ ग्रह पाहत असेल तर एक चरण कार्यसिद्धि
- लग्न व लग्नेश दाहोंना जर शुभ ग्रह पाहत असेल तर अर्धी सिद्धि
- दोन तीन शुभग्रह लग्नेशावर व लग्नावर दृष्टि टाकत असतील तर त्रिभाग कार्यसिद्धि
- चंद्रावर पापदृष्टि नसेल व शुभग्रह व लग्नेश लग्नावर दृष्टि टाकत असतील तर पूर्णयोग व पूर्णकार्यसिद्धि

# प्रश्नज्योतिष - एकापेक्षा अधिक प्रश्न

एकापेक्षा अधिक प्रश्न असतील तर ज्ञानमुक्तावली नुसार पुढीलप्रमाणे उत्तर द्यावे

- पहिल्या प्रश्नाचे उत्तर लग्नापासून
- दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर चंद्रापासून
- तिसरा प्रश्न सूर्यापासून
- चौथा गुरू पासून
- पाचवा बुध वा शुक्र यांपैकी जो बलवान असेल त्यापासून सोडवावे.

शक्यतो एका वेळी एकच प्रश्न सोडवावा. स्वतः वराहमिहिर, प्रश्नचिंतामणि अनेक प्रश्न एका वेळी सोडविण्याच्या विरुद्ध असल्याने तेच योग्य वाटते

# प्रश्नज्योतिष - एकापेक्षा अधिक प्रश्न

- अ वर्गाचा रवि, क वर्गाचा मंगळ, च वर्गाचा शुक्र, ट वर्गाचा बुध, त वर्गाचा गुरु, प वर्गाचा शनि, य वर्गाचा श वर्गाचा चंद्र स्वामी आहे.
- प्रश्नकर्त्याच्या तोंडून प्रथम उच्चारण होईल त्या अक्षरवर्गाचा स्वामी धरून वर्गाच्या विषम नंबरच्या अक्षरांसाठी विषम राशी समजावी.

शक्यतो एका वेळी एकच प्रश्न सोडवावा. वराहमिहिर अनेक प्रश्न एका वेळी सोडविण्याच्या विरुद्ध असल्याने तेच योग्य वाटते

# प्रश्नज्योतिष - प्रश्नकर्ता कसा आहे

**प्रश्नकर्ता कुटिल आहे हे कसे ओळखावे**

- लग्नभावात चंद्र; केंद्रात शनि, अस्तंगत बुध
- लग्नातील चंद्रावर मंगळ बुध समदृष्टि टाकत असतील तर
- लग्नी पापग्रह असतील तर
- बुध वा गुरू सप्तमावाकडे शत्रुदृष्टीने पहात असेल तर

**प्रश्नकर्ता सरळ आहे हे कसे ओळखावे**

- लग्न वा सप्तमावर चंद्र बुध गुरू यांची दृष्टि असेल तर
- चंद्र गुरूदृष्ट असेल तर

# ताजिक पद्धतीचे सामान्य नियम

- ताजिक पद्धतीच्या प्रश्नकुंडलीचे नियमही सामान्यत: वेदिक पद्धतीच्या नियमांप्रमाणे असतात.
- प्रात:काली शुचिर्भूत होवून दक्षिणा, पुष्प, गोड, फळे इ घेवून ज्योतिषाकडे जावे व एक प्रश्न विचारावा
- ग्रहांचे दीप्तादि दशभेद जाणणारा, त्यांचे गणित जाणणरा व समस्त जातकशास्त्र ज्ञात असलेल्या ज्योतिषाने शुभाशुभ फल सांगावे
- दशभेदाचा पाठ कोणी कोणी दशाभेद असा केला आहे परंतु येथे ग्रहांच्या अवस्थेवरून होणाऱ्या दशभेदाचा प्रयोग केला आहे

# ताजिक पद्धतीचे सामान्य नियम

- ताजिक पद्धतीच्या महत्वाच्या योगांमध्ये ग्रहदृष्टि व दीप्तांश अतिशय महत्वाचे ठरतात
- ग्रहदृष्टि - मित्रदृष्टि - स्व अधिष्ठानापासून नवम व पंचम दृष्टि ३ चरण व बलवती प्रत्यक्ष स्नेहदा असते, पूर्ण कार्यसिद्धि करणारी असते मेलापकदृष्टि; ३ स्थानावर ४० कला व ११ स्थानावर १० कला असते गुप्तस्नेहकर व कार्य सिद्ध करणारी असते
- ग्रहदृष्टि - शत्रुदृष्टि - ४ व १० स्थानावर १५ कला गुप्तदृष्टि, परस्पर ७ व १ स्थानांमध्ये सर्व कार्यांचा नाश करणारी व दुष्ट अशी क्षुत नामक दृष्टि पूर्ण; १२ अंशाच्या आतील मानतात. अशीच दृष्टि फल देण्यास समर्थ असते

# ताजिक पद्धतीचे सामान्य नियम

- जो पाहतो तो द्रष्टा व ज्याला पाहतो तो दृश्य ग्रह. गणिताने सूक्ष्म दृष्टि पुढीलप्रमाणे काढतात
- उदा स्पष्ट रवि ११।१२।२२।१७ व स्पष्ट चंद्र ००।२०।४९।०२
- चंद्राची रवीवर असलेली सूक्ष्म दृष्टि गणिताने काढावयाची आहे - दोहोची वजाबाकी १०।२१।३३।१५ येते.
- द्रष्टा - दृश्य जितक्या राशी येतील त्याप्रमाणे कलात्मक गत ध्रुव येतात ते असे - ०।४०।१५।४५।०।६०।०।४५।१५।१०।०।६०
- वरील उदाहरणात राशी १० म्हणून कलात्मक गत ध्रुवांक १०

# ताजिक पद्धतीचे सामान्य नियम

- ऐष ध्रुव काढण्यासाठी गत ध्रुवाने अंशादिकांना गुणावे गुणाकार २१५।३२।३० येतो त्यास ३० ने भागावे ७।१५ येतात हा गत ध्रुवापेक्षा कमी असल्याने त्यातून वजा करावा २।४९ ही झाली रवीवर असलेली चंद्राची सूक्ष्म दृष्टि.
- ग्रह स्वत:च्या दीप्तांशाच्या आतमध्ये व बाहेर स्वत: इतक्या अंशावरच स्पष्ट दृष्टि देतो व जर दीप्तांशापेक्षा अधिक अंश असल्यास मध्यम फल देतो. अर्थात् जितक्या अंशावर ग्रह असेल तितक्याच अंशापर्यंत पुढे मागे तो दृश्य राशीवर दीप्तांशतुल्य दृष्टि टाकतो

# ताजिक पद्धतीचे सामान्य नियम - ग्रह दीप्तांश

| | |
|---|---|
| रवि | १५ |
| चंद्र | १२ |
| मंगळ | ०८ |
| बुध | ०७ |
| गुरु | ०९ |
| शुक्र | ०७ |
| शनि | ०९ |

# प्रश्नज्योतिष - ग्रहांचे दीप्तादि भेद

| ग्रहभेद | ग्रहलक्षण | ग्रहफल |
|---|---|---|
| दीप्त | उच्च असतांना | कार्यसिद्धि |
| दीन | नीच असतांना | दु:ख |
| मुदित | मित्रराशीत असतांना | आनंद |
| स्वस्थ | स्वराशीत असतांना | धनलाभ कीर्ति |
| सुप्त | शत्रुराशीत असतांना | शत्रुभय |
| निपीडित | दुसऱ्याकडून पराजित | धनहानि |
| मुषित | अस्तंगत | कार्यनाश |

# प्रश्नज्योतिष - ग्रहांचे दीप्तादि भेद

| ग्रहभेद | ग्रहलक्षण | ग्रहफल |
| --- | --- | --- |
| परिहीन | नीचाभिमुख | अर्थनाश |
| सुवीर्य | उच्चाभिमुख | हत्ती घोडे रत्न लाभ |
| अधिवीर्य | शुभग्रहांच्या वर्गात रश्मीवाला | मित्र धन लाभ |

जो ज्योतिषी ग्रहांचे दशभेद व भावबल समजून शुभाशुभ फल सांगतो त्याची वाचा कधीही फोल ठरत नाही. सारावलीत ९ अवस्था, संकेतनिधीत १२; दैवज्ञवल्लभ, ताजिक, वृहज्जातक १०, शिवाय २७ कर्मावस्था सारावलीमध्ये वर्णन केल्या आहेत

# ताजिक पद्धतीसाठी महत्वाच्या बाबी

- ताजिक पद्धतीच्या महत्वाच्या योगांमध्ये ग्रहदृष्टि व दीप्तांश अतिशय महत्वाचे ठरतात
- ग्रहदृष्टि - मित्रदृष्टि - स्व अधिष्ठानापासून नवम व पंचम दृष्टि ३ चरण व बलवती प्रत्यक्ष स्नेहदा असते, पूर्ण कार्यसिद्धि करणारी असते मेलापकदृष्टि; ३ स्थानावर ४० कला व ११ स्थानावर १० कला असते गुप्तस्नेहकर व कार्य सिद्ध करणारी असते
- ग्रहदृष्टि - शत्रुदृष्टि - ४ व १० स्थानावर १५ कला गुप्तदृष्टि, परस्पर ७ व १ स्थानांमध्ये सर्व कार्यांचा नाश करणारी व दुष्ट अशी क्षुत नामक दृष्टि पूर्ण; १२ अंशाच्या आतील मानतात. अशीच दृष्टि फल देण्यास समर्थ असते

# ताजिक पद्धतीसाठी महत्वाच्या बाबी

- जो पाहतो तो द्रष्टा व ज्याला पाहतो तो दृश्य ग्रह. गणिताने सूक्ष्म दृष्टि पुढीलप्रमाणे काढतात
- उदा स्पष्ट रवि ११।१२।२२।१७ व स्पष्ट चंद्र ००।२०।४९।०२
- चंद्राची रवीवर असलेली सूक्ष्म दृष्टि गणिताने काढावयाची आहे - दोहोंची वजाबाकी १०।२१।३३।१५ येते.
- द्रष्टा - दृश्य जितक्या राशी येतील त्याप्रमाणे कलात्मक गत ध्रुव येतात ते असे - ०।४०।१५।४५।०।६०।०।४५।१५।१०।०।६०
- वरील उदाहरणात राशी १० म्हणून कलात्मक गत ध्रुवांक १०

# ताजिक पद्धतीसाठी महत्वाच्या बाबी

- ऐष ध्रुव काढण्यासाठी गत ध्रुवाने अंशादिकांना गुणावे गुणाकार २१५।३२।३० येतो त्यास ३० ने भागावे ७।१५ येतात हा गत ध्रुवापेक्षा कमी असल्याने त्यातून वजा करावा २।४९ ही झाली रवीवर असलेली चंद्राची सूक्ष्म दृष्टि.
- ग्रह स्वत:च्या दीप्तांशाच्या आतमध्ये व बाहेर स्वत: इतक्या अंशावरच स्पष्ट दृष्टि देतो व जर दीप्तांशापेक्षा अधिक अंश असल्यास मध्यम फल देतो. अर्थात् जितक्या अंशावर ग्रह असेल तितक्याच अंशापर्यंत पुढे मागे तो दृश्य राशीवर दीप्तांशतुल्य दृष्टि टाकतो

# ताजिक मधिल ग्रहदृष्टि विचार

- या शास्त्राने ग्रहदृष्टि ३ प्रकारची मानली आहे.
- संमुख म्हणजे स्वस्थानापासून ७ वी - ही संपूर्ण दृष्टि झाली
- वामदृष्टि म्हणजे स्वस्थानापासून ३, ४, व ५ या स्थानांवर
- दक्षिणदृष्टि म्हणजे स्वस्थानापासून ९, १०, व ११ या स्थानांवर
- वाम वा समीप दृष्टि बलवती सांगितली आहे
- चतुर्थापेक्षा दशमावर कमी बलवान दृष्टि असते
- तृतीयावर ४० कला तर ११ वर १० कला असते

# उदाहरणासाठी कुंडली



# ग्रहाच्या स्पष्ट दृष्टीसाठी उदाहरण

उदा. वरील कुंडलीत मेषेचा शुक्र १३ अंशावर आहे. त्याची ४थी दृष्टि कर्केवर १३ अंशावर आहे. त्यांचा दीप्तांश ७ आहे. म्हणून १३ + ७ अशा २० अंशापर्यंत व १३ - ७ अशा ६ अंशापर्यंत त्याची स्पष्ट दृष्टि असणार आहे. म्हणून चंद्र जो १३ अंशांवर आहे त्याची पूर्ण दृष्टि आहे. त्यापेक्षा गुरूवर कमी व गुरूपेक्षाही शनीवर कमी आहे. गुरू ११ अंशावर व शनि १८ अंशावर आहे. अंशांतर जितके कमी तितके फल अधिक सिद्ध होते दीप्तांशाबाहेरील दृष्टि फल मध्यम देते.

# ताजिक मधिल १६ योग

१. इक्कवाल

२. इन्दुवार

३. इत्थशाल

४. ईसराफ

५. नक्त

६. यमया

७. मणाऊ

८. कांबुल

९. गैरिकांबुल

१०. खल्लासर

११. रद्द

१२. दुफालीकुत्थ

१३. दुत्थोत्थवीर

१४. तंबीर

१५. कुत्थ

१६. दुरफ

# इक्कवाल व इंदुवार

- पहिला इक्कवाल व दुसरा इंदुवार दोन्ही योग जन्म कुंडलीत, वर्ष कुंडलीत वा प्रश्न कुंडलीत सारखीच स्वयोगाची फले देतात
- जर सर्व ग्रह केंद्रात व पणफरमध्ये असतील तर इक्कवाल योग होतो व असा योग राज्य व सुख देतो
- जर सर्व ग्रह आपोक्लिममध्ये असतील तर इंदुवार योग होतो व असा योग जन्म कुंडली असो, वर्ष कुंडली असो वा प्रश्न कुंडली असो, दुःखदायक ठरतो.

# इत्थशाल योग

- जेव्हा शीघ्रगति ग्रह कमी भुक्तांशावर व मंदगति ग्रह अधिक भुक्तांशावर पुढे असेल व दोहोंची दृष्टि एकमेकांवर असेल व दृष्टि दीप्तांशापेक्षा कमी अंशावर असेल तर इत्थशाल योग होतो.
- इत्थशाल योग पूर्ण असेल तर कार्य झालेले असते व त्याला मुत्थशाल असे काही टीकाकार म्हणतात.
- पूर्ण, वर्तमान व भविष्य असे इत्थशाल योगाचे प्रकार पुढे सविस्तर सांगितले आहेत.
- शनीज्य भौमार्क सीतज्ञ चंद्राः। शनि, गुरु, मंगळ, रवि, शुक्र, बुध व चंद्र ही मंद ते शीघ्र ग्रहांची गति होय

# इत्थशाल योगासाठी कुंडली



# इत्थशाल योग

समजा संततियोग पहावयाचा आहे

- लग्नेश मंगळ व कार्येश रवि; यातील मंगळ मंदगति ७ अंशांवर आहे व सूर्य शीघ्रगति १ अंशावर आहे. दोहोतील अंशात्मक अंतर हे ६ असून ते मंगळाच्या दीप्तांशापेक्षा कमी आहे. संततीयोग निश्चित.

समजा आपण धनयोग पाहतो आहोत

- स्वकर्तृत्वावर कमाविलेले धन धनस्थानी. कार्येश शुक्र. लग्नेश मंगळ. कार्येश शीघ्रगति व मार्गी व फक्त एक विकला लग्नेशापेक्षा कमी. पूर्ण इत्थशाल. धन मिळाले व अद्याप मिळते आहे.

# इत्थशाल योग

समजा भाग्योदय पहावयाचा आहे

- लग्नेश मंगळ व कार्येश गुरू; यातील मंगळ शीघ्रगति व गुरू मंदगति पण दोहोतील अंशात्मक अंतर हे ८ असून ते मंगळाच्या दीप्तांशाबरोबर आहे. थोडयाच वेळात इत्थशाल होणार म्हणून भविष्यत् धनलाभ निश्चित.

समजा आपण शेतीचा योग पाहतो आहोत

- कार्येश चंद्र मिथुनेच्या ३० अंशावर. कर्केत आल्यावर भविष्यत: इत्थशाल. म्हणून भविष्यात हे काम नक्की होणार.

# इसराफ योग


जर शीघ्रगति उलटा चालला - वक्री असेल - तर मात्र त्या शीघ्रगति ग्रहातील व मंदगति ग्रहातील अंतर वाढतच जाईल. यास इसराफ योग म्हणतात व तो शुभ ग्रहांचा मध्यम व पाप ग्रहांचा अशुभ आहे. येथे कमी अंश असलेला ग्रह तेज देणारा व जास्त अंश असलेला ग्रह तेज घेणारा असा असतो.

- जेव्हा शीघ्रगति ग्रह मंदगति ग्रहाच्या १ अंशही अधिक असेल तर इसराफ योग होतो. या योगास मुसरिफ असेही म्हणतात.

# नक्त योग व यमया योग

**जर लग्नेश व कार्येश यांच्यात परस्परदृष्टि नसेल परंतु दोहोच्या मध्ये व मंदगति ग्रहाच्या मागे जर अजून एकादा शीघ्रगति ग्रह असेल तो मागील शीघ्रगति ग्रहाकडून तेज घेऊन ते पुढील मंदगति ग्रहाला देतो. याला नक्तयोग म्हणतात.**

**समजा स्त्रीलाभ पहायचा आहे. कार्येश गुरु व लग्नेश बुध यांमध्ये चंद्र आहे. तो बुधाकडून तेज घेऊन गुरूला देतो. हा नक्त योग झाला. चंद्राऐवजी मंद ग्रह असेल तर तो यमया योग झाला**



# कांबूल योग

**जर लग्नेश व कार्येश यांच्यात इत्थशाल असेल व त्यातील एक ग्रह चंद्र असेल तर सदर योगास कांबूल योग म्हणतात. लग्नेश कार्येश यांचे अधिकार व चंद्राधिकार यांवरून एकूण १६ प्रकारचे कांबूल योग ताजिक ग्रंथात वर्णन केले आहेत. ते अधिकार असे:**

**लग्नेश कार्येश अधिकार**

**चंद्राधिकार**

| | उत्तमाधि. | मध्यमाधि. | अधमाधि. | शून्याधिकार |
|---|---|---|---|---|
| उत्तमाधि. | उत्तमोत्तम १ | उत्तममध्य २ | उत्तमाधम ३ | उत्तम ४ |
| मध्यमाधि. | मध्यमोत्तम ५ | मध्यमध्य ६ | मध्याधम ७ | मध्यम ८ |
| अधमाधि. | अधमोत्तम ९ | अधममध्य १० | अधमाधम ११ | अधम १२ |
| शून्याधि. | उत्तम १३ | मध्यम १४ | अधम १५ | सम १६ |

# सहम् - ताजिकचे वैशिष्टय

सहम हे ताजिकमधिल असे बिंदु आहेत की जे गणिताने काढावयाचे आहेत. प्रत्येक बिंदूचे गणित वेगळे आहे. हा बिंदू ज्या राशीत पडेल त्या राशीच्या स्वामीच्या अंशावरून वा दशेवरून फलाचा कालनिर्णय करता येतो. असे ५० बिंदू या शास्त्रात सांगितले आहेत.

१ पुण्य २ गुरु ३ ज्ञान ४ यश ५ मित्र ६ माहात्म्य ७ आशा ८ सामर्थ्य ९ भ्राता १० गौरव ११ राज १२ पिता १३ माता १४ पुत्र १५ जीवन १६ जल १७ कर्म १८ रोग १९ कंदर्प २० कलह २१ क्षमा २२ शास्त्र २३ बंधु २४ बंदक २५ मृत्यु २६ परदेश २७ धन २८ परस्त्री २९ अन्य कर्म ३० वाणिज्य ३१ कार्यसिद्धि ३२ विवाह ३३ प्रसूति ३४ संताप

# सहम् - ताजिकचे वैशिष्टय

३५ श्रद्धा ३६ प्रीति ३७ बल ३८ देह ३९ जडता ४० व्यापार ४१जलपतन ४२ शत्रु ४३ शौर्य ४४ उपाय ४५ दरिद्रता ४६ गुरुता ४७ जलपथ ४८ बंधन ४९ कन्या ५० अश्व

सर्वप्रथम जन्मकुंडलीत सहमचा विचार करून जे शक्य आहे तेच केवळ वर्षकुंडलीतील सहम मध्ये पहावे.

नियम असा आहे की शोध्य राशी व शुद्धाश्रय राशी यांच्या मध्ये जर लग्न येत नसेल तर सहम मधे १ राशी जोडावी

या सहमचा कालनिर्णय करता येत असल्याने सद्यस्थितीतील प्रश्नाला उत्तर देणे ज्योतिषाला गणितावरून सोपे जाऊ शकते

# वर्षफल - ताजिकचे वैशिष्टय

वर्षफलात जातकाच्या जन्मकुंडलीला त्या वर्षापुरते फल कळण्यासाठी अधिक विस्तारित केले जाते. जन्मवेळचा स्पष्ट रवि ज्या वर्षाची कुंडली काढावयाची आहे त्या वर्षी तितक्याच अंशादिकांवर ज्या क्षणी येतो त्या क्षणाची कुंडली म्हणजे वर्षकुंडली होय.

वर्षफल पाहण्यासाठी वर्षकुंडली काढणे आवश्यक असते. वास्तविक जन्मलग्नकुंडली असतांना पुन्हा वर्षकुंडलीचे प्रयोजन काय असे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु भविष्यकथनाच्या अधिक सूक्ष्मतेसाठी व सूक्ष्मतेच्या अधिक सुकरतेसाठी ही ताजिक पध्दति वापरली जाते.

# वर्षफल - ताजिकचे वैशिष्टय

**वर्षफल काढण्याची पद्धति:**

- प्रथम गत वर्षे मोजावीत.
- ताजिक तालिकेचा उपयोग करून दिवस तास मिनिटे व सेकंद मोजावेत
- जन्मवेळची दिवस, तास मि से या संख्येत अधिक करावी.
- गत वर्षे एकूण दोन आकडी आल्यास दोन आकडयांची बेरीज करून एक आकडा घ्यावा व त्यात जन्मवेळचा दिवस, तास मि से अधिक करावा

# वर्षफल - ताजिकचे वैशिष्टय

**वर्षेश काढण्याची पद्धतिः**

- **वर्षकुंडलीतील लग्नेश**
- **जन्मलग्नकुंडलीतील लग्नेश**
- **वर्षकुंडलीतील वर्षप्रवेश रात्री असल्यास चन्द्र असलेल्या राशीचा स्वामी वा वर्षप्रवेश दिवसा असल्यास सूर्य असलेल्या राशीचा स्वामी**
- **वर्षकुंडलीचा मुन्थास्वामी**
- **वर्षकुंडलीचा त्रिराशीस्वामी**

# पंचवर्गीय बलसाधन - ताजिकचे वैशिष्टय

पंचवर्गीय बलसाधन - कोणत्याही ग्रहाचे बल पुढील पद्धतीने काढले जाते. जिथे जिथे प्रश्न ज्योतिषात दोन्हींपैकी बलवान असा उल्लेख आहे तिथे बल या पद्धतीने काढले जाते :

- गृह
- उच्च
- हद्द
- द्रेष्काण
- नवांश

# हर्षबल - ताजिकचे वैशिष्टय

हर्षबल - हे देखिल पंचवर्गीय बलाबरोबर पाहिले जाते

- वर्षकुंडलीत रवि ९वा, चन्द्र ३ रा, मंगळ ६ वा, बुध १ ला, गुरु ११ वा, शुक्र ५ वा व शनि १२ वा हे ग्रह हर्षित असतात
- स्वगृहीचे वा स्वोच्चराशीतील ग्रह हर्षित असतात
- लग्नापासून १,२,३,७,८,९ स्थानी स्त्रीग्रह व ४,५,६,१०,११,१२ स्थानी पुरुषग्रह हर्षित होतात
- वर्षप्रवेश दिवसा असल्यास पुरुषग्रह व रात्री असल्यास स्त्रीग्रह हर्षित होतात

# मुंथा - ताजिकचे वैशिष्टय

मुंथा हा लग्नबिंदु होय. एका दिवसात तिची गति ५ कला असून तिलाच इन्तिहा असेही म्हणतात.

गताब्ध + लग्नराशी = मुंथा

मुंथाफल:

- मुंथा आपले स्वामी व शुभग्रह यांच्यामुळे सुख देते. पापदृष्टीने भय व रोग देते. वर्षलग्नापासून ४,६,७,८,१२ स्थानात ती अशुभप्रद असते.
- ५,९,१०,११ स्थानात शुभफले देते
- बाकी स्थानी मध्यम फले देते

# मुंथा - ताजिकचे वैशिष्टय

मुंथेची भावगत फले:

- लग्नी मुंथा असल्यास शत्रुनाश प्रतिष्ठा पुत्रसुख वाहनसुख राजाचा अनुग्रह शरीराची पुष्टता व विविध उद्योगातून लाभ होतो
- धनेची मुंथा असल्यास उत्साह धन यश राजाश्रय बंधूंकडून आदर स्वादिष्ट भोजन बल पुष्टी सर्व सुखे प्राप्त होतात
- पराक्रमात मुंथा असल्यास धन यश सुख सुंदरता ब्राह्मणपूजा देवपूजा राजाश्रय प्राप्त होतो
- चतुर्थात मुंथा असल्यास शरीरपीडा शत्रुभय आप्तवैर मनस्ताप कष्ट संताप रोगोवृद्धि आलस्य इ प्राप्त होतात

# मुंथा - ताजिकचे वैशिष्टय

**मुंथेची भावगत फले:**

- पंचमात मुंथा असल्यास सुबुद्धि सुपुत्रलाभ धनलाभ सुख ब्राह्मणपूजा देवपूजा राजाश्रय प्राप्त होतो
- षष्ठात मुंथा असल्यास कृशता शत्रुवृद्धि चोर व राजाचे भय कार्यनाश धननाश कुबुद्धि कुकर्मे व त्यामुळे पश्चात्ताप प्राप्त होतो
- सप्तमात मुंथा असल्यास स्त्री बंधुपीडा उत्साहभंग धननाश धर्मनाश रोगोद्भव मनोपीडा विरुद्ध कार्य
- अष्टमात मुंथा असल्यास शत्रुभय धननाश दुर्व्यसन बलनाश दूर गमन

# मुंथा - ताजिकचे वैशिष्टय

**मुंथेची भावगत फले:**

- नवमात मुंथा असल्यास धर्मोत्सव राजापासून धनलाभ स्त्री पुत्रसुख सुयश भाग्योदाय ब्राह्मणपूजा देवपूजा व राजाश्रय प्राप्त होतो
- दशमात मुंथा असल्यास सर्व कार्यसिद्धि राजानुग्रह साधूंचे आशीर्वाद यशवृद्धि ब्राह्मणपूजा देवपूजा व राजाधिकार प्राप्त होतो
- एकादशात मुंथा असल्यास सुख सौभाग्य प्रसन्नता राजाश्रयामुळे धनलाभ सन्मित्र व सुपुत्रप्राप्ति
- द्वादशात मुंथा असल्यास खर्च रोग दुर्जनसंग आप्तवैर धर्महानि निष्फळता

# फल कथन - ताजिकचे वैशिष्टय

**कोणतेही फल कथन करतांना:**

- चंद्र हा बीजासम, लग्न हे फुलासम नवांशादिला फलासम व बाकी सर्व भावांना स्वाद मानून ज्योतिषाने कोणतेही फल कथन करावे
- प्रश्नकाली लग्नी शुभग्रह वर्ग असेल तर बाकी काहीही न पाहता शुभ फलाचे कथन करावे
- लग्नेश लाभेश योगात व शुभ असतील तर शुभ फल कथन करावे
- त्यांच्यावर चंद्राची दृष्टि असेल तर अतिशय लाभप्रद समजावे.

# प्रश्नज्योतिष

**लग्नभाव -**

- स्वत:चे सुखदु:ख वा आरोग्य वा देह यांविषयी शुभाशुभ फल सांगतांना लग्नेश लग्नी शुभग्रह दृष्ट वा युक्त असेल तर सर्व दु:खादींचा वा क्लेशादींचा विफलतेचा दोषांचा नाश होतो.
- जर लग्नेश पापी असून पापग्रह दृष्ट वा युक्त असेल तर धननाश, अनारोग्य, कलह यांचा प्रादुर्भाव होतो.
- परंतु लग्नेश पापग्रह असून शुभयुक्त वा दृष्ट असेल तर निष्पन्नबुद्धि धन व सुख मिळते

# प्रश्नज्योतिष

धनभाव -

- धनात पापग्रह असतील तर धनहानीबरोबरच बाकी अशुभ फले
- धनेश वा लग्नेश पापग्रहाशी मुथशीलयोग करतील तर मृत्यु संभवतो

धनलाभ होईल का?

- जर धनेश लग्नेश व चंद्र इत्थशाल योगात असतील तर धनलाभ होईल. जर शुभग्रहदृष्ट असतील तर धनलाभ होईल
- लग्नेश धनेश इत्थशाल असून जो मंदगति असेल तो ज्या भावाचा भावेश असेल त्याच्याकडून धनलाभ होईल.

# प्रश्नज्योतिष

धनलाभ होईल का?

- लग्नी बुध चंद्रदृष्ट वा पापग्रहदृष्ट असेल तर धनलाभ होईल पण तो अशुभही असेल
- चंद्र धनेश व लग्नेश परस्परदृष्ट असतील युक्त असतील व केंद्रकोणात असतील तर शीघ्र धनलाभ होतो
- लग्नी शुभग्रह स्वषडवर्गात शुभग्रह दृष्ट असेल तर शीघ्र धनलाभ
- चतुर्थ वा सप्तमात चंद्र दशमात रवि व लग्नी शुभग्रह लगेच धनलाभ
- गुरू एकटा जरी लग्नी असेल तरी धनलाभ होतो

# प्रश्नज्योतिष

**सहजभाव -**

- **तृतीयेश शुभदृष्ट असून जर तृतीय भावाला पाहत असेल तर सहोदर स्वस्थ सुखी समजावा**
- **तृतीयेश अस्ताला असेल तर ते सहोदरास भयप्रद होते**
- **तृतीयेश षष्ठंश इत्थशाल वा परिवर्तन योग असेल तर सहोदरास अनारोग्य**

# प्रश्नज्योतिष

मातृभाव -

चतुर्थ भावाचा शेती, घर, गृह इ शी संबंध असल्याने सर्वाचे योग समानच असतात.

या बाबत लग्न म्हणजे शेतकरी, चतुर्थ भाव शेती, सप्तम भावात कृषि म्हणजे अन्नादि व दशम भावात वृक्ष पहावेत.

जमीन वा भाडयाच्या घराचा प्रश्न असेल तर लग्नी प्रश्नकर्ता सप्तमात भाडेकरू दशमात आरंभ व चतुर्थात अंत मानावा

# प्रश्नज्योतिष

**मला शेतीचा लाभ होईल का**

- चंद्र लग्नेश चतुर्थेश इत्थशाल योगात वा तीनही ग्रह चतुर्थात असतील तर शेतीचा लाभ होतो
- प्रश्नलग्नी शुभग्रह असेल तर भरपूर धान्याचा लाभ होतो
- लग्नी पापग्रह असेल तर चोरीचा उपद्रव शेतधान्याला होतो
- चतुर्थात पापग्रह असेल तर शेतकरी शेत सोडून निघून जातो
- सप्तमात पापग्रह असेल तर धान्य उपज होत नाही
- दशमात दशमेश असेल वृक्ष उत्तम होतात

# प्रश्नज्योतिष

**भाडयासंदर्भात प्रश्न**

- **दशम भावात पापग्रह सुरूवातीस भाडयाच्या बाबतीत त्रास देतो**
- **चतुर्थातील पापग्रह शेवटी भाडयाच्या बाबतीत त्रास देतो**
- **सप्तमातील पापग्रह भाडेकरूपासून त्रास देतो**
- **लग्न शुभ ग्रहदृष्ट व युक्त वा शुभयोगात असेल तर प्रश्नकर्ता शुभ फले चाखतो**

# प्रश्नज्योतिष

संततिभाव

संतति होईल का?

- चंद्र लग्नेश पंचमेश इत्थशाल योगात असतील तर संततिलाभ होतो
- पंचमेश लग्नी व लग्नेश आणि चंद्र पंचमात असतील तर शीघ्र संतति लाभ होतो
- यांच्यात जर नक्त योग असेल तर विलम्ब सांगावा
- लग्नी द्विस्वभाव राशी असेल व पंचमभाव शुभग्रहयुक्त असेल तर दोन संतानांचा योग सांगावा

# प्रश्नज्योतिष

संतति पुरुष की स्त्री?

- पंचमेश पुरुष राशीत असेल तर पुत्र जन्माला येतो
- चंद्र पुरुष राशीत असेल व पुरुष ग्रहाशी इत्थयाल करत असेल तर पुत्र जन्म होतो
- प्रश्न अपराह्नकाली असेल व रविमागे चंद्र असेल तर कन्या जन्मेल
- रवि होरा असेल व लग्नी विषम राशी असेल तर पुत्र समजावा

स्त्री गर्भवती आहे का; गर्भ जिवंत आहे का; प्रसूति कोणत्या स्थानी होईल; असे प्रश्न येथे घेतले नाहीत.

# प्रश्नज्योतिष

या वर्षी संतति होईल का?

- पंचमेश लग्नेश इत्थशाल योगात असतील अथवा परिवर्तनयोगात असतील तर संतति त्याच वर्षी राहील

रिपुभाव

लग्नी वैद्य, सप्तमात रोग, चतुर्थात औषध व दशमात रोगी समजावा

- जर लग्नी पापग्रह असेल तर वैद्याच्या मुळे अधिक त्रास समजावा
- दशमातील पापग्रह रोग्याचे कुपथ्य सुचवितो
- सप्तमातील पापग्रह एका रोगातून अनेक रोगोत्पत्ति सुचवितो

# प्रश्नज्योतिष

## रिपुभाव

- जर चतुर्थात पापग्रह असेल तर औषधामुळे रोग अजूनच वाढण्याची शक्यता निर्माण होते
- या सर्व ठिकाणी शुभग्रह असतील तर रोगी लवकर रोगमुक्त होतो
- लग्नेश चंद्र इत्थशाल असेल तर रोगी लवकर बरा होतो

## रोग्याचा मृत्यु

- वक्री लग्नेश व चंद्राचा इत्थशाल
- अष्टमेश लग्नी वा लग्नेश किंवा चंद्रमा अष्टमात असेल तर

# प्रश्नज्योतिष

**रोग्याचा मृत्यु**

- सप्तमेश अष्टमात व चंद्र हा लग्नेश सूर्य व सप्तमेशाशी इत्थशाल
- केंद्रस्थित लग्नेश व पापयुक्त वा अस्तंगत अष्टमेशाशी इत्थशाल
- अष्टमेश व लग्नेश केंद्रस्थित असून इत्थशाल योगात व दुसऱ्या ग्रहाकडून पराजित होत असतील तर
- सूर्याच्या द्वादशांशात जर लग्नेश असेल तर

**रोग स्थिर राहणे**

- प्रश्नलग्न स्थिर असेल तर

# प्रश्नज्योतिष

रोग स्थिर राहणे

- चंद्र वक्री ग्रहाशी इत्थशाल करत असेल तर
- शनि चंद्राचा इत्थशाल असेल तर मूत्रनिरोधाने रोगोत्पत्ति

शुभकाल

- प्रश्नकालाच्या आधी ७ दिवसात व नंतर ४ दिवसात जर चंद्र व रवि दोघेही शुभ ग्रहदृष्ट वा युक्त होतील तर ते शुभ मानावे

रोग आहे का? लग्नेश वा चंद्र षष्ठेशाशी इत्थशाल करत असतील तर वा अस्त असतील तर रोग आहे नपेक्षा नाही

# प्रश्नज्योतिष

**याच मालकाकडे नोकरी राहील की दुसरी मिळेल?**

- जर का लग्नेश केंद्रात असेल व त्याचा द्वादशेश वा षष्ठेशाशी इत्थशाल नसेल तर हीच नोकरी राहील
- लग्नेश वक्री होवून जर तृतीय वा नवमस्थानस्थित ग्रहाशी इत्थशाल करत असेल तर दुसरी नोकरी करावी लागेल. लग्नेश चंद्र कांबूल योग असेल तर हाच मालक बरा. सप्तमेश चंद्र कांबूल दुसरा बरा
- लग्नेश केंद्रात व पापग्रह नवमास शत्रुदृष्टीने पाहत असेल तर वा लग्नेश अस्तास असेल तर एकाच माणसाची नोकरी जन्मभर करावी लागते

# प्रश्नज्योतिष

**नोकर किंवा पशूसंबंधी लाभ**

- जर लग्नेश वा षष्ठेश षष्ठात असेल वा षष्ठेशाशी इत्थशाल करत असेल तर लाभ होईल असे सांगावे
- जर वाहन वा नोकराचा प्रश्न असेल तर लग्नेश व दाता समजून सप्तमेश यांच्यात इत्थशाल झाला तर लाभ नपेक्षा हानि
- छोटे पशु षष्ठात पहावेत व मोठे दशमात पहावेत असे मत आहे. अर्थात याला ग्रंथाचा संदर्भ नाही पण पाळीव पशु षष्ठात पहावेत असे भावविचारात वाचावयास मिळते

# प्रश्नज्योतिष

सप्तमस्थान

स्त्रीलाभ होईल का?

- सप्तमेश व लग्नेश वा चंद्र यात इत्थशाल असेल तर कोणत्याही विनंतीविना वा प्रयत्नाविना सहज हो म्हणेल
- लग्नेश वा चंद्र सप्तमात असेल तर विनंती केल्यावर होकार
- चंद्र लग्नेशाशी ईसराफ व सप्तमेशाशी इत्थशाल करत असेल तर अनायाय स्त्री प्राप्त होते
- जो ग्रह चंद्राशी इत्थशाल करतो तो अस्त वा पापयुत वा दृष्ट असेल तर स्त्रीविषयक कार्यच नष्ट होते

# प्रश्नज्योतिष

स्त्रीलाभ होईल का?

- सप्तमातील पापग्रह जर अष्टमेश असेल तर स्त्रीकडून, चतुर्थेश असेल तर मातापित्याकडून, तृतीयेश असेल तर भावंडाकडून कार्य नष्ट नष्ट होते. इतर कोणताही भावेश हे करू शकत नाही

या स्त्रीचे प्रेम मिळेल का?

- सप्तमेश व लग्नेश यांच्यात मित्रभाव असून मुथशील योग असेल तर अतिशय प्रेम समजावे. शत्रूदृष्टि व इत्थशाल असेल तर कलह परंतु चंद्र कंबूल योगात असेल तर मात्र शत्रुदृष्टि देखिल मित्रात परिवर्तित होते

# प्रश्नज्योतिष

स्त्री व पुरुषाचे प्रेम एकमेकांवर कसे असेल?

- लग्नेश मंदगति असून केंद्री असेल तर पुरुष बलवान समजावा
- सप्तमेश बलवान असून केंद्री असेल तर स्त्री बलवान समजावी
- लग्नेश व सप्तमेश जर एकत्र असतील तर प्रेम व कलह चालू असेल
- प्रश्नसमयी सूर्य निर्बली असेल तर पुरुषाला अशुभ, शुक्र निर्बली असेल तर स्त्रीला अशुभ, दोन्ही निर्बली दोघांना वलवान असतील तर दोघांनाही शुभ

# प्रश्नज्योतिष

रुसून गेलेली स्त्री परत येईल का?

- लग्न ते चतुर्थात जर सूर्य असेल तर नाही येणार. चतुर्थ ते सप्तम शुक्र असेल तरी नाही येणार
- शुक्र वक्री असेल तर परत येईल
- सूर्याशी शुक्र इसराफ योग करत असेल तर परत येईल
- पूर्ण चंद्र असेल तर लवकर परत येईल परंतु चंद्र क्षीण असेल तर मात्र विलंब लागेल

# प्रश्नज्योतिष

**अष्टमभाव: जय की पराजय? निवडणूक, स्पर्धा, खेळ, शर्यत इ**

- **लग्नेश व लग्नेशाबरोबरचे ग्रह आणि चंद्र यात इत्थशाल असेल तर प्रश्नकर्ता बलि असतो. लग्नेश व लग्नेशाबरोबरचे ग्रह आणि चंद्र यात इत्थशाल असेल शत्रु बलि असतो. योग जर सारखेच बलवान असतील तर प्रश्नकर्ता व शत्रु दोघेही तुल्यबल असतात**
- **शनि, मंगळ गुरू हे मंदगति ग्रह जर शीघ्र गति बुध, शुक्र चंद्रापेक्षा जास्त अंशावर असतील तर बलवान समजावेत व अशा परिस्थितीत प्रश्नकर्ता जिंकेल व ते दुर्बल असतील तर प्रश्नकर्ता देखिल दुर्बल मानून पराजय होतो असे समजावे**

# प्रश्नज्योतिष

जय की पराजय? निवडणूक, स्पर्धा, खेळ, शर्यत इ

- लग्नेश उपचय स्थानी असेल, ३,६,१०,११; लग्नेश व सप्तमेश यात इत्थशाल असेल तर दोघांमध्ये स्नेह निर्माण होतो संधि होते
- दोहोपैकी एक जो कमी अंशावर असतो तो पराजित होतो
- दोन्ही ग्रहांचा अस्त ग्रहाशी इसराफ असेल तर युद्ध खूप दिवस चालते
- लग्नेश जास्त अंशावर मंदगति असून कंबूलयोग करेल तर प्रश्नकर्ता जिंकतो. सप्तमेश अस्त, अस्त व केंद्री, नीच असेल तर शत्रुचा जय

# प्रश्नज्योतिष

जय की पराजय? निवडणूक, स्पर्धा, खेळ, शर्यत इ

- लग्नाच्या मागे बुध शुक्र चंद्र असतील व पुढे गुरु मंगळ शनि असतील तर प्रश्नकर्त्याला सहयोद्धे चांगले मिळतात
- लग्नेश अष्टमात व अष्टमेशाशी इत्थशाल करेल तर प्रश्नकर्ता मृत्यु
- सप्तमेश द्वितीयात व द्वितीयेशाशी इत्थशाल करेल तर शत्रु मृत्यु
- लग्नेश दशमेश इत्थशाल असेल तर प्रश्नकर्ता जिंकतो
- दोन्ही वर्गाचे ग्रह केंद्री व केंद्रेशाशी इत्थशाल करतील तर जो वर्ग बलि असेल त्याचा जय. चर राशीचा ग्रह बलवान

# प्रश्नज्योतिष

**जय की पराजय? निवडणूक, स्पर्धा, खेळ, शर्यत इ**

- **लग्नेश व्ययात असेल तर प्रश्नकर्त्याचा नाश व सप्तमेश त्याच्या व्ययात असेल तर शत्रूचा नाश**
- **दशमेश लग्नी असेल तर प्रश्नकर्ता कोणाची तरी मदत घेतो**
- **चतुर्थेश सप्तमात असेल तर शत्रूला मदत मिळते**
- **ज्या ग्रहाचा रवि व चंद्राशी इत्थशाल योग असेल तो बलवान व ज्या ग्रहाचा इसराफ होईल तो बलहीन**

# प्रश्नज्योतिष

**नवम भाव: माझी यात्रा होईल की नाही?**

**लग्नी मार्ग सम असेल तर सरळ, दशम भावात कार्य, सप्तम भावानुसार गम्य स्थळ, व चतुर्थ भावानुसार कार्य परिणाम पहावा**

- **लग्नेश नवमेश केंद्रस्थ असून इत्थशाल योगात असतील तर**
- **नवमेश लग्नी व लग्नेशाच्या इत्थशाल योगात असेल तर यात्रा होते**
- **लग्नेश नवम दृष्टीने नवमेशाला पहात असेल तर वा दोहोतील योग परत आलेल्या व्यक्तीला पुन्हा यात्रेस पाठवितो**
- **पापरहित तृतीयभावस्थ ग्रहाशी लग्नेश केंद्री असून इत्थशाल योग**

# प्रश्नज्योतिष

**नवम भाव: माझी यात्रा होईल की नाही?**

- **केंद्री पापग्रह असतील तर यात्रा होत नाही**
- **सप्तमात पापग्रह ज्या कामासाठी यात्रा ते काम करू देत नाहीत**
- **दशमभावातील पापग्रह राजकुलातून वा मोठया बंधूंकडून विघ्न आणतात.**
- **नवमेश जर लग्नेशाशी इत्थशाल करेल पण पापदृष्ट असेल तर यात्रा तर होते पण शेवटी प्रश्नकर्त्याला त्रास सहन करावा लागतो व धननाश होतो.**

# प्रश्नज्योतिष

**नवम भाव: माझी यात्रा होईल की नाही?**

- लग्न वा चंद्र ज्या पापग्रहाने दृष्ट असेल वा युत असेल तो पापग्रह ज्या राशीत राहतो त्यानुसार मार्गात भय. पापग्रह द्विपद राशीत द्विपद द्रेष्काणात असेल तर माणसापासून भय; जलचर राशीत असेल तर जलजंतूंपासून भय; चतुष्पद राशीत असेल तर घोडा, इ चतुष्पादापासून भय
- कुंभ व धनु राशीत वृक्ष काटयांपासून भय
- सिंहेत वाघ सिंहाचे भय

# प्रश्नज्योतिष

नवम भाव: अमुक ठिकाणी जावून फायदा होईल का?

- लग्नी द्वितीयेश वक्री असेल तर फायदा कार्यसिद्धि नाही
- द्वितीयेश अतिचारी असेल तर खूप दिवस रहावे लागते पण कार्यसिद्धि नाही
- धनेश तृतीयात वा नवमात असेल तर त्वरित काम करून घरी
- द्वितीयेश १,१०,११ असेल तर शुभ; पापग्रहाबरोबर सप्तमात असेल तर मार्गात त्रास; चतुर्थात असेल तर भांडण

# प्रश्नज्योतिष

**दशम भावः राज्यलाभ, पदलाभ, अधिकार लाभ इ**

- लग्नेश वा चंद्र दशमेशाशी दशम दृष्टीने इत्थशाल करत असतील तर कुलज राज्यलाभ
- लग्नेश दशमात व दशमेश लग्नात पापग्रहरहित असतील तर इच्छित राज्यलाभ
- लग्नस्थ शुभ ग्रहाशी दशमेशाचा इत्थशाल झाला तरी इच्छित राज्यलाभ होतो
- या दोन्ही ग्रहात जो मंदगति असेल तो पापग्रहदृष्ट वा युक्त असेल तर हातात आलेल्या गोष्टीत विघ्न येते

# प्रश्नज्योतिष

**दशम भाव: राज्यलाभ, पदलाभ, अधिकार लाभ इ**

- लग्नेश स्वराशीत व मंगळ उच्चीचा असेल तर राज्यलाभ
- लग्नेश व दशमेश यांच्यात जो मंदगति असेल तो बलि व पापरहित असेल व चंद्र निर्बल असेल तर सैन्याबरोबर फिरत राज्यलाभ
- लग्नेश दशमेश इत्थशाल व केंद्रगत चंद्राशी कंबूल योग असेल तर उत्तम राज्यलाभ होतो व चंद्र जर स्वराशीत असेल तर विशाल राज्यलाभाचा योग येतो
- लग्नेशस्थित राशेश अशुभ स्थानी कार्यसिद्धि देत नाही. सप्तमात कष्टसिद्धि, दशमात कार्यात विघ्न

# प्रश्नज्योतिष

**दशम भाव: राज्यलाभानंतरचा राज्यकारभार**

- लग्नस्थानावरून शरीरकार्य, सप्तमावरून गृहकार्य, दशमावरून राज्यकार्य व चतुर्थावरून मित्रकार्य समजते
- धनस्थानावरून आर्थिक मदत, तृतीयस्थानावरून नोकरांची मदत, एकादश स्थानावरून मित्रांची मदत, षष्ठस्थानावरून शत्रूंकडून मदत याचा विचार होतो
- या सर्व ठिकाणी असलेल्या शुभ वा अशुभ ग्रहावरून फल ठरवावे. उदा. बुध धनेश असेल तर वाणिज्यास अर्थव्यय होईल
- लग्नेश निर्बल नीचीचा असेल तर राज्यनाश होईल

# प्रश्नज्योतिष

**एकादश भाव:**

**शासक लोकांकडून माझा सन्मान होईल का?**

- **लग्नेश व एकादशेश बरोबर मित्रदृष्टीने मुथशील योगात असेल तर लगेच सन्मान होईल पण शत्रुदृष्टीने योग असेल तर विलंब**
- **लग्नेश केंद्री असेल व कम्बूल योग असेल तरी लाभ होतो**
- **लग्नेश चर राशीत असेल तर शीघ्र; द्विस्वभाव राशीत असेल तर विलंब; स्थिर राशीत असेल तर बरेच दिवसांनी का असेना आशा पूर्ण होते.**

# प्रश्नज्योतिष

शासक लोकांकडून माझा सन्मान होईल का?

- मंदगति ग्रह पापयथर्कीं असल्यास लाभ मिळून नष्ट होतो.
- पापयुक्त असतील तरी शुभग्रह योग असल्यास योग्यतेनुसार मान मिळतो

आम्हा मित्रांचे प्रेम असेच राहील का?

- लग्नेश दशमेश एकमेकांशी मित्रदृष्टीने मुथशील योग येत असेल वा त्यांचा परिवर्तन योग असेल तर मित्रांची मैत्री राहील
- दोघे केंद्रात असतील तर पूर्वीपासून मैत्री असेल; पणफर भावी असतील तर मैत्री होईल आपोक्लिम असेल तर परस्पर प्रेम भरपूर

# प्रश्नज्योतिष

**माझे गुप्त कार्य सिद्ध होईल का?**

- लग्नेश अथवा चंद्राचा शुभग्रहाशी मुथशील योग असेल वा केंद्रात वा पणफर स्थानी असेल तर सिद्ध होते

**द्वादशभाव: शत्रुनिग्रहा बाबत प्रश्न**

- षष्ठेश बली असल्यास शत्रु बलवान समजावा.
- जर द्वादशेश बलवान व केंद्री असेल तर प्रश्नकर्ता बलवान असेल
- शत्रूचे नाव घेवून षष्ठेश बली असेल तर शत्रू व नामोच्चारण न करता द्वादशेश बली असेल तर प्रश्नकर्ता बलवान असेल

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**परदेशी गेलेली व्यक्ती परत येईल का?**

- लग्नेश व लग्नस्थित वा दशमस्थित ग्रहाशी इत्थशाल योग असेल तर परदेशी सुखपूर्वक घरी येईल.
- लग्नेश व सप्तमस्थित वा चतुर्थस्थित ग्रहाशी इत्थशाल योग असेल तर परदेशी कष्टाने घरी येईल.
- लग्नेश ३,९ भावात असेल तर परदेशी त्या गावाहून निघून गेला
- लग्नस्थ ग्रहाशी मुथशील असेल वा अष्टम द्वितीयात असून दशमस्थित ग्रहाशी मुथशील असेल तर रस्त्यात आहे असे समजावे

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**परदेशी गेलेली व्यक्ती परत येईल का?**

- लग्नेश वक्री असून लग्नाला पाहत असेल तर अथवा चंद्राला वक्री होवून मुथशील करत असेल तर व्यक्ती लवकर सुखाने घरी येते
- लग्नेश द्वादश भावात चंद्राबरोबर मुथशील करत असेल तर व्यक्ती लवकर घरी येते.
- लग्न वा चतुर्थापासून २, ३ भावात शुभ ग्रह असतील तर हरवलेली वस्तु वा हरवलेली व्यक्ती लवकर मिळते
- पापग्रहाच्या राशीत स्थित शनि ४,८,५,९स्थित पापग्रहाने दृष्ट असेल तर व्यक्ती कैदेत आहे असे समजावे

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**परदेशी गेलेली व्यक्ती परत येईल का?**

- लग्न स्थिर व शुभग्रहयुक्त असेल बंधन स्थिर, लग्न चर असेल तर बंधनातून लवकर मुक्त होता येते. द्विस्वभाव असेल तर बंधनातून मुक्त होवून पुन्हा बंधनात पडावे लागते
- लग्न व ५,९,७ स्थानी असतील व आपल्या शत्रूने दृष्ट असतील व पृष्ठोदय लग्न असेल तर व्यक्तीला कष्ट समजावे
- नवमात सूर्य असेल तर परदेशीला रोगयुक्त समजावे
- चतुर्थापासून दशमापर्यंत असलेल्या ग्रहाशी चंद्र इत्थशाल असेल वा शुभग्रहदृष्ट असेल तर परदेशीला सुखपूर्वक जीवित समजावे

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

हरवलेली व्यक्ती जिवंत आहे की मृत?

- लग्नी पृष्ठोदय राशी असून लग्नावर पापग्रहांची दृष्टि असेल व षष्ठस्थानीदेखिल पापग्रह असेल तर व शुभग्रहांची दृष्टि नसेल तर व्यक्ती मृत असण्याची शक्यता तपासावी
- लग्नेश व चंद्र ४,६,८ भावात नीचीचा वा अस्त असेल तर किंवा अष्टमेशाशी इत्थशाल करत असेल, वा पापग्रहयुक्त असेल तरही
- लग्न ते चतुर्थस्थित वक्री ग्रहाशी चंद्र इत्थशाल करत असेल तर
- शुभ ग्रह ६,८,१२ पापग्रहदृष्ट व रवि चंद्र पापग्रहयुक्त असतील तर

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**प्रवासाला गेलेल्या व्यक्तीची सांप्रत स्थिति काय असेल?**

- तृतीयात पापग्रह असेल तर तो एका जागेवरून दुसऱ्या जागेवर गेला असावा असे म्हणता येईल.
- जर केंद्री पापग्रह असतील तर त्या प्रवाशाचे पैसे चोरले गेले असे समजावे
- पापग्रहयुक्त शनि नवमात असेल व शुभग्रहदृष्ट नसेल तर रोगभय
- अष्टमात असेल तर मरण असू शकते
- जर ६,८ स्थानात शुभग्रह असतील तर मालकामुळे व पापग्रह असतील तर चोरांच्या भयामुळे परत आले नाहीत

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

प्रवासाला गेलेल्या व्यक्तीची सांप्रत स्थिति काय असेल?

- चंद्र रवि शनिदृष्ट व अष्टमात असतील तर शत्रूपासून अस्त्राचे भय असते
- बुध शुक्र अष्टमात सुखप्राप्ति व मंगळ शुक्र अष्टमात पापग्रहदृष्ट असतील तर मार्गात भय

जाणे होईल का?

- लग्नापासून चतुर्थात वा दशमात शुभग्रह असतील तर होणार नाही
- ४,१० मध्ये पापग्रह असतील तर जाणे होईल

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**जाणे होईल का?**

- **लग्नापासून ९,१२ जितके पापग्रह असतील तितक्या मार्गात अडचणी व जितके शुभग्रह असतील तितके अभ्युदय मार्ग**

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**हरवलेली वा चोरीची वस्तु**

- वस्तु चोरीला गेली का हे केंद्रावरून ठरवावे
- लग्न व चंद्र ज्याचे धन गेले ती व्यक्ती दर्शवितात. सप्तम स्थान चोराचे निदर्शक आहे. चतुर्थस्थान चोरीचा माल दर्शविते
- वस्तु कशी असावी हे प्रश्नलग्नाच्या नवमांशावर; चोराचे वर्णन उदित लग्नाच्या द्रेष्काणावरून; उदित लग्नावरून वस्तु कुठे असेल केव्हा चोरी झाली व राशी स्वामीवरून चोराचे वय जात रंग इ. जाणावा

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**हरवलेली वा चोरीची वस्तु - चोर कोण असेल**

- **लग्नेश सप्तमेश लग्नी असतील तर घरातीलच कोणी वस्तु ठेवली असेल.**
- **लग्नावर रवि चंद्राची दृष्टि असेल तरी घरचाच कोणी असेल**
- **सप्तमेश व्ययात वा तृतीयात असेल तर घरचा नोकर असेल**
- **सप्तमेश बलवान असेल तर चोर प्रसिद्ध असेल त्याचा सहाय्यक कोण असेल याचा अंदाज लग्न सप्तम दशम या स्थानामध्ये जो बलवान ग्रह असेल त्या वरून करावा.**

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**हरवलेली वा चोरीची वस्तु - चोर कोण असेल**

- लग्नेश, सप्तमेश वा दशमेशापैकी जो ग्रह बलवान असेल त्याच्या कारकत्वा वरून चोराचा अंदाज घ्यावा उदा. रवि असेल तर पिता, चंद्र असेल तर माता, शुक्र बायको, शनि मुलगा, मंगळ भाऊ , गुरु घरातील महत्वाची वयस्कर व्यक्ती
- सप्तमेश बुध असून जर तो नीच राशीत असेल मित्र वा नातेवाईक चोर असतील.
- पुण्यसहमावर पापदृष्टि असेल तर संशयित चोर असेल व पुण्यसहमावर शुभदृष्टि असेल तर संशयित चोर नसेल

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**हरवलेली वा चोरीची वस्तु - चोर कोण असेल**

- **सप्तमेश मंगळाशी मुसरिफ करत असेल तर चोर पूर्वी पण पकडला गेला असेल. शनि सप्तमेश असून चंद्राच्या दृष्टीत असेल तर चोर पारवंडी असेल**
- **सप्तमेशावर गुरूची दृष्टि असेल तर चोर प्रसिद्ध असून सर्वांच्या समोर चोरी झाली असेल; मंगळ दृष्टि टाकत असेल तर पैसे पुरून ठेवले असतील; शुक्र कुलूप उघडून घुसला असेल**

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**अमुक व्यक्ती चोर असेल का?**

- **चंद्र पापग्रहांशी इत्थशाल करत असेल तर तीच व्यक्ती चोर असेल**

**चोरीची वस्तु कोठे असेल?**

- **लग्न स्थिर राशीचे, स्थिर नवांशात वा वर्गोत्तम नवांशात असेल चोरलेली वस्तु तेथेच जवळ असेल व प्रश्नकर्त्याच्या जवळच्या नातेवाईकाने चोरली असेल**
- **लग्न राशी १, २, वा ३ द्रेष्काणात असेल त्याप्रमाणे चोरलेली वस्तु घराच्या बाहय मध्य वा शेवटच्या भागात असेल.**

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**चोरीची वस्तु परत मिळेल का?**

- लग्नी बलवान चंद्र असेल व लग्न शुभग्रहदृष्ट असेल तर वस्तु परत मिळेल.
- लग्नी बलवान चंद्रयुक्त शीर्षोदय राशी असेल, शुभ ग्रहांनी दृष्ट व लाभी बलवान शुभ ग्रह असेल तर लगेच मिळेल
- लग्न चतुर्थेशयुक्त वा दृष्ट असेल तर व चंद्र चतुर्थेशाच्या दृष्टीत असेल तर परत मिळेल
- धनेश धनात अथवा चतुर्थात असतांना परत मिळेल

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**चोरीची वस्तु परत मिळेल का?**

- लग्नेश सप्तमात व सप्तमेश लग्नात असतांना लग्नेश सप्तमेशाचा इत्थशालयोग असेल तर धन मिळेल.
- सप्तमेश लग्नेश इत्थशाल असता चोर स्वतः धन परत करेल
- चतुर्थात पापग्रह असता परत मिळणार नाही.
- मंगळ सप्तमात वा अष्टमात असेल तर धन दुसरीकडे ठेवले गेल्याने मिळणार नाही
- लग्नी राहु अष्टमात रवि असतांना धन मिळणार नाही
- रवि लग्नी सप्तमात चंद्र असतांना देखिल धन मिळणार नाही

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**हरवलेली वा चोरीची वस्तु कोठे असेल**

- चतुर्थातील राशीवरून चोरीचा माल कोठे असेल याचा अंदाज करता येतो. उदा माल घरीच असेल व अग्निराशी असेल तर स्वयंपाकघर, जलराशी असेल तर पाण्याची टाकी बाथरूम इ
- चतुर्थातील ग्रह किंवा चतुर्थेश यावरून चोरीचा माल कोठे असेल त्याचा अंदाज करता येतो. शनि घाणेरडी जागा, चंद्र पाण्याजवळ, गुरु देऊळ, मंगळ आगीजवळ, रवि घरातील प्रमुख व्यक्ती जेथे असते तिथे, शुक्र शयनकक्षा, बुध जेथे पुस्तके वगैरे असतील तेथे

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**हरवलेली वा चोरीची वस्तु दिशा कोणती शोधावी**

- वस्तु कोणत्या दिशेस मिळेल हे केंद्रातील ग्रह व उदित लग्नावरून ठरवितात.
- लग्नी जर ग्रह असेल तर त्या ग्रहाच्या अधिपत्याखाली असलेल्या दिशेस ती मिळेल. जेव्हा केंद्री ग्रह नसतील तेव्हा लग्नराशीवरून व एकापेक्षा अधिक ग्रह असल्यास बलवान ग्रहावरून ठरवावी
- दिशा - सूर्य पूर्व; शुक्र अग्नेय; मंगळ दक्षिण; राहु नैऋत्य; शनि पश्चिम; चंद्र वायव्य; बुध उत्तर; गुरू ईशान्य

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**हरवलेली वा चोरीची वस्तु कशी असेल**

- ५,६,७,८ राशी असतील तर वस्तु लांब असते; ३,४,९,१० असतील तर रुंद असते; १,२,११,१२ असतील तर लहान असते
- ती किती लांब गेली आहे हे समजण्यासाठी पंचम स्थानापासून लग्नापर्यंत किती नवमांश आहेत ते मोजून तितकी योजने सांगावी
- जर नवांशाचा स्वामी बलवान असेल तर वस्तु मौल्यवान असण्याची शक्यता; साधारण असेल तर वस्तूही तशीच असेल व बलहीन असेल तर छिद्र्युक्त असेल वा नीचीचा असेल तर वा अष्टमात असेल तर स्वस्त, जुनी वा झिजलेली असेल. हरवलेली वस्तु राशीच्या रंगाची असते.

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**स्वस्ताई वा महागाई**

- मेष वृषभ मिथुन राशीत सूर्य जर शुभदृष्ट वा युक्त असेल तर ग्रैष्मिक म्हणजे ग्रीष्मात पिकणारे अन्न भरपूर नसेल. धनु मकर कुंभेतील सूर्य शुभदृष्ट वा युत असेल तर स्वस्ताई होईल पापग्रहयुक्त वा दृष्ट असतील तर महागाई
- प्रश्नलग्न लग्नेश व शुभग्रह युक्त वा दृष्ट असेल व केंद्री सर्व शुभग्रह असतील तर स्वस्ताई पापग्रह असतील तर महागाई

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**खरेदी व विक्री: लग्नेशाला क्रेता व लाभेशाला विक्रेता मानावे**

- **प्रश्नसमयी एकादश भावापेक्षा लग्न बलवान असेल तर क्रेता म्हणजे जो खरेदी करतो त्याला लाभ होतो. अशा वेळी खरेदीला प्राधान्य द्यावे**
- **प्रश्नसमयी लग्नापेक्षा एकादश भाव बलवान असेल तर विक्रेता म्हणजे जो विकतो त्याला लाभ होतो अशा वेळी विक्रीला प्राधान्य द्यावे**

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

मुलगी हो म्हणेल का?

- सप्तमेश व लग्नेश वा चंद्र यात इत्थशाल असेल तर कोणत्याही विनंतीविना वा प्रयत्नाविना सहज हो म्हणेल
- लग्नेश वा चंद्र सप्तमात असेल तर विनंती केल्यावर होकार
- जो ग्रह चंद्राशी इत्थशाल करतो तो अस्त वा पापयुत वा दृष्ट असेल तर स्त्रीविषयक कार्यच नष्ट होते
- सप्तमातील पापग्रह जर अष्टमेश असेल तर स्त्रीकडून, चतुर्थेश असेल तर मातापित्याकडून, तृतीयेश असेल तर भावंडाकडून कार्य नष्ट होते. इतर कोणताही भावेश हे करू शकत नाही

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**नोकर किंवा पशूसंबंधी लाभ**

- जर लग्नेश वा षष्ठेश षष्ठात असेल वा षष्ठेशाशी इत्थशाल करत असेल तर लाभ होईल असे सांगावे
- जर वाहन वा नोकराचा प्रश्न असेल तर लग्नेश व दाता समजून सप्तमेश यांच्यात इत्थशाल झाला तर लाभ नपेक्षा हानि
- छोटे पशु षष्ठात पहावेत व मोठे दशमात पहावेत असे मत आहे. अर्थात याला ग्रंथाचा संदर्भ नाही पण पाळीव पशु षष्ठात पहावेत असे भावविचारात वाचावयास मिळते

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**याच मालकाकडे नोकरी राहील की दुसरी मिळेल?**

- जर का लग्नेश केंद्रात असेल व त्याचा द्वादशेश वा षष्ठेशाशी इत्थशाल नसेल तर हीच नोकरी राहील
- लग्नेश वक्री होवून जर तृतीय वा नवमस्थानस्थित ग्रहाशी इत्थशाल करत असेल तर दुसरी नोकरी करावी लागेल. लग्नेश चंद्र कांबूल योग असेल तर हाच मालक बरा. सप्तमेश चंद्र कांबूल दुसरा बरा
- लग्नेश केंद्रात व पापग्रह नवमास शत्रुदृष्टीने पाहत असेल तर वा लग्नेश अस्तास असेल तर एकाच माणसाची नोकरी जन्मभर करावी लोते

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**रोगी बरा होईल अथवा कसे?**

- **लग्नी वैद्य, दशमभावात रोगी, सप्तमात रोग व चतुर्थात औषध**
- **लग्नी पापग्रह असेल तर वैद्य चुकीचा, दशमात असेल तर कुपथ्य; चतुर्थात असेल तर औषधयोजना चुकीची, सप्तमात असेल तर एका रोगातून अनेक रोगांची उत्पत्ति**
- **या सर्व ठिकाणी जर शुभ ग्रह असतील तर रोगमुक्ती लवकर होते**
- **लग्नेश चंद्र इत्थशाल योग असेल तर रोग नष्ट**
- **अष्टमेश लग्नी वा लग्नी वा चंद्रापासून अष्टमात लग्नेश असेल तर रोग्याचा मृत्यु असण्याची खूप शक्यता**

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

**मालमत्ता पुनश्च मिळविणेबाबते**

- बलवान चंद्र शुद्ध दशमीपासून कृष्ण पंचमीपर्यंत मानावा. असा चंद्र, गुरू शुक्र दृष्ट लग्नी असेल तर मालमत्ता लगेच परत मिळते.
- लाभात बलवान शुभ ग्रह असेल तरी मालमत्ता लगेच परत मिळते. समजा बलवान गुरु लाभात आहे तर मालमत्ता लगेच परत मिळते. परंतु जर शनि गुरूबरोबर लाभात आहे तर मात्र मालमत्ता न मिळण्याचीही शक्यता निर्माण होते.
- खरे तर ज्योतिष शास्त्राची तत्वे नीट समजून उमजून विश्लेषक बुद्धीने स्वीकारली ग्रह तारे यांचे बल समजून केलेले भाकित उत्तम

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

लग्न स्थिर राशीचे असेल तर:

- प्रवासी अजून निघालाच नसेल; जातकाचा मृत्यु झाला नसेल: जातकाला कोणत्याही व्याधीचा त्रास झाला नसेल; शत्रूकडून त्याचा पाडाव होणार नाही; त्याचे कोणतेही नुकसान होणार नाही

लग्न चर राशीचे असेल तर:

- वरील विरुद्ध भाकित करावे लागेल

लग्न द्विस्वभाव राशीचे असेल तर:

- मिश्र फले मिळतील

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

- लग्न स्थिर राशीचे वृषभ, सिंह, वृश्चिक, कुंभ यांपैकी असेल तर व प्रश्न सद्यस्थितीवर असेल तर त्यात काही बदल होणार नाही
- प्रश्न घर बदलणे, बदली वा प्रवासाचा असेल तरीही ते होणे नाही
- प्रश्न व्यक्तीच्या मृत्यूबाबत असेल तर जिवंत असणे शक्य.
- प्रश्न जर वस्तूच्या चोरीविषयी असेल तर चोरी नसण्याची शक्यता व वस्तु न हरविल्याची शक्यता जास्त
- प्रश्न रोग बरा होईल का तर नाही होणार
- जयपराजय असेल तर जय होईल

# प्रश्नज्योतिष - शत्रुविषयक विशेष प्रश्न

- लग्न स्थिर राशीचे असेल व चंद्र द्विस्वभाव राशीत असेल तर शत्रु आला तरी त्याला परत जावे लागेल
- लग्न चर राशीचे असेल तर बरोबर या विरुद्ध उत्तरे द्यावीत
- लग्न चर राशीचे असेल व चंद्र स्थिर राशीत असेल तर शत्रु येणार नाही व पराजय होणार नाही
- लग्न चर राशीचे व चंद्र द्विस्वभाव राशीत असेल तर शत्रु जवळ येतो पण परत जातो
- लग्न द्विस्वभाव राशीचे व चंद्र चर राशीत असेल तर शत्रु अर्धवट रस्ता पार करतो पण परत जातो

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

- लग्न चर राशीचे व चंद्र द्विस्वभाव राशीत असेल व त्यांच्यावर शुभ ग्रहांची दृष्टि असेल तर शत्रूचा दारूण पराभव होतो
- लग्न द्विस्वभाव राशीचे असेल तर मिश्र उत्तरे द्यावीत. टीकाकार भट्टोत्पल यांचे मताप्रमाणे राशीचा प्रथम होरा स्थिर लग्नाप्रमाणे घ्यावा. द्वितीय होरा चर लग्नाप्रमाणे घ्यावा.
- जर लग्न, सप्तम व दशमात शुभ ग्रह असतील तर प्रश्नकर्ता राजा जिंकेल; नवमात मंगळ व शनि असेल तर शत्रूचा पराजय; जर गुरू बुध शुक्र नवमात असतील तर शत्रूचा पराजय होतो

# प्रश्नज्योतिष - शत्रु देशातून जाण्याचा कालनिर्णय

**शत्रूच्या देश सोडून जाण्याचा कालनिर्णय कसा घ्यावा -**

- **सर्वात बलवान ग्रह पहावा. तो लग्नापासून किती दूर आहे ते पहावे. तितके महिने कालनिर्णयास लागतील असे मानावे.**
- **जर सर्वात बलवान ग्रह चर नवमांशात असेल तर वरीलप्रमाणेच कालनिर्णय घ्यावा, जर स्थिर नवमांशात असेल तर काल दुप्पट करावा व जर द्विस्वभाव राशीत असेल तर काल तिप्पट करावा**
- **सप्तमाचा स्वामी पहावा. तो मार्गी लागेपर्यंतचा काळ पहावा. हे शनि, राहु, केतु यांना लागू नाही.**

# प्रश्नज्योतिष - चोरीविषयक विशेष प्रश्न

- लग्न स्थिर राशीचे, स्थिर नवांशात वा वर्गोत्तम नवांशात असेल चोरलेली वस्तु तेथेच जवळ असेल व प्रश्नकर्त्याच्या जवळच्या नातेवाईकाने चोरली असेल छ.प्र. ३८
- लग्न राशी १, २, वा ३ द्रेष्काणात असेल त्याप्रमाणे चोरलेली वस्तु घराच्या बाहय मध्य वा शेवटच्या भागात असेल. छ प्र ३९
- लग्नी बलवान चंद्र असेल व लग्न शुभग्रहदृष्ट असेल तर वस्तु परत मिळेल.
- लग्नी बलवान चंद्रयुक्त शीर्षोदय राशी असेल, शुभ ग्रहांनी दृष्ट व लाभी बलवान शुभ ग्रह असेल तर लगेच मिळेल

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

- वस्तु कोणत्या दिशेस मिळेल हे केंद्रातील ग्रह व उदित लग्नावरून ठरवितात.
- लग्नी जर ग्रह असेल तर त्या ग्रहाच्या अधिपत्याखाली असलेल्या दिशेस ती मिळेल. जेव्हा केंद्री ग्रह नसतील तेव्हा लग्नराशीवरून व एकापेक्षा अधिक ग्रह असल्यास बलवान ग्रहावरून ठरवावी
- दिशा - सूर्य पूर्व; शुक्र अग्नेय; मंगळ दक्षिण; राहु नैऋत्य; शनि पश्चिम; चंद्र वायव्य; बुध उत्तर; गुरू ईशान्य
- हरवलेली वस्तु राशीच्या रंगाची असते. ग्रह असतील तर मिश्र रंग

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

- ५,६,७,८ राशी असतील तर वस्तु लांब असते; ३,४,९,१० असतील तर रुंद असते; १,२,११,१२ असतील तर लहान असते
- ती किती लांब गेली आहे हे समजण्यासाठी पंचम स्थानापासून लग्नापर्यंत किती नवमांश आहेत ते मोजून तितकी योजने सांगावी
- जर नवांशाचा स्वामी बलवान असेल तर वस्तु मौल्यवान असण्याची शक्यता; साधारण असेल तर वस्तूही तशीच असेल व बलहीन असेल तर छिद्रयुक्त असेल वा नीचीचा असेल तर वा अष्टमात असेल तर स्वस्त, जुनी वा झिजलेली असेल.
- दिनबली राशी १,२,३,४,९,१०असेल तर चोरी दिवसा झाली असे समजावे

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

- मीन राशी उभयोदयी आहे.
- राशी जर दिनबली असतील तर चोरी दिवसा झाली म्हणता येते
- चोरीच्या वस्तूसाठी राशींच्या संचारस्थानाचादेखिल विचार करता येतो
- चोराचे वय, जात इ ग्रहावरून कळते. मंगळ असल्यास लहान मूल, बुध असेल तर १२ वर्षांपर्यंत वयाचे मूल, गुरू असेल तर १५ वर्षांपर्यंत मूल, शुक्र ३२ वर्षांपर्यंत, रवि ७० वर्षांपर्यंत, शनि ८० ते ९० वर्षांपर्यंत व जात ग्रहावरून सांगता येते

# प्रश्नज्योतिष विशेष प्रश्न

- थोडक्यात, वस्तु कशी असावी हे प्रश्नलग्नाच्या नवमांशावर; चोराचे वर्णन उदित लग्नाच्या द्रेष्काणावरून; उदित लग्नावरून वस्तु कुठे असेल केव्हा चोरी झाली व राशी स्वामीवरून चोराचे वय जात रंग इ. जाणावा